हडळ

भयकथा संग्रह

दिपक कदम

हडळ

भयकथा संग्रह

दिपक कदम

कॉपीराइट © 2022 दिपक कदम

सर्व हक्क राखीव

या पुस्तकात कथेतील सर्व पात्रं आणि घटना काल्पनिक आहेत. वास्तविक
जिवंत किंवा मृत व्यक्तींशी कोणतीही समानता असल्यास हा योगायोग आहे आणि लेखकाचा यात कसलाही हेतू नाही.

या पुस्तकाचा कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ शकत नाही किंवा पुनर्प्राप्ती सिस्टममध्ये संग्रहित केला जाऊ शकत नाही किंवा कोणत्याही स्वरुपात किंवा कोणत्याही प्रकारे, इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, छायाप्रती, रेकॉर्डिंग किंवा अन्यथा प्रकाशकाच्या स्पष्ट लेखी परवानगीशिवाय प्रसारित केला जाऊ शकत नाही.

ISBN-13: 9781234567890
ISBN-10: 1477123456

कव्हर डिझाइन: Pixabay, Canva
लायब्ररी कॉंग्रेस कंट्रोल नंबरची: 2018675309

सामग्री

शीर्षक पृष्ठ
कॉपीराइट
एक डोळा
बळी
आडवाटेची ब्याद
अंजक एक बाहुली
कामिनी
हडळ
झोटिंग
मृत्यूरेषा
पिंपळवेळा
शेवटचा तास
विळखा तिचा

एक डोळा

निलेश आणि प्रमोद दोघेही पक्के मित्र. अगदी लहानपणापासून दोघंही एकत्र वाढलेली. शाळेतही एकत्रच येत जात असत. जून महिन्याचा तीसरा आठवडा होता. शाळा सुरू होऊन आठ दिवस झाले होते. दोघेही नवव्या इयत्तेत शिकत होते. शाळा दुपारी बारा वाजता भरत असे आणि संध्याकाळी सहा वाजता सुटत असे. नुकताच मोठा पाऊस होऊन गेला होता.

त्या दिवशी शनिवार होता, शाळेचा अर्धा दिवस होता. दुपारचे तीन वाजले होते. शेवटचा तास सुरू झाला होता. पण शिक्षक आजारी असल्याने शाळेत आले नव्हते. वर्गात मुलांचा कल्ला सुरू होता. बाहेर रिमझिम पाऊस सुरू होता.

"पम्या आज साळा सुटल्याव लगीच घरला नग जायला", निलेश प्रमोदला म्हणला.

"का र, मग कुठं जायचं", प्रमोदने विचारले.

"आरं नदीवर जाऊ मास पकडाय", निलेश त्याचे घारे पाणीदार डोळे मिचकावत म्हणाला.

"आर पर पाऊस पडाय लागलाय लगा"

"आर बारीक झिरमाट हाय, तासाभरात जाऊन परत येऊया की, आन तशीबी उद्या सुटीच हाय की साळला"

"ते ठीक हाय रं, पर मास पकडणार कस, गळ आणाय नग", प्रमोद म्हणाला.

"त्याच टेन्शन नको घेऊस हे बघ", असे म्हणत निलेशने त्याचे दप्तर उघडले आणि त्यातील गळ प्रमोदला दाखवला.

प्रमोद थोडा विचार करीत म्हणाला, "बर ठीक हाय, पर जास्त येळ करायचा न्हाय बग".

"येळ न्हाय लागत र बाबा", निलेश आनंदी होत म्हणाला.

साडे तीन वाजले तशी शाळा सुटल्याची घंटा वाजली आणि एक एक करीत पोर शाळेतून बाहेर पडली. निलेश आणि प्रमोद शाळेच्या फटकातून बाहेर आले. आणि नदीच्या दिशेने निघाले.

पावसाची संततधार सुरू होती. अधूनमधून उनही पडत होते. निलेश आणि प्रमोद दोघेही भरभर चालत नदीच्या दिशेने निघाले होते.

"निल्या मास लै भरली असतील नै नदीला", प्रमोद म्हणाला.

"मंग न्हाय तर काय लगा, म्हणून तर म्हणालो आज जाऊया मास पकडाय"

दोघेही आता एका शेतातून जात होते. ते रंगा नाईकाचे शेत होते. नदीवर जायला त्या शेतातून वाट होती पण दोघांनाही अजून दोन फर्लांगभर तरी चालावे लागणार होते. दुपारचे चार वाजून गेले होते. शेतातील ओबडधोबड बांध आणि पायवाटेवरून दोघेही चालत होते. पुढे एका वळणावर त्यांना दुरूनच कोणीतरी दिसले. अंगात फाटक मळका शर्ट घातलेला, पायातील तांबडी प्यांट वाऱ्याच्या झोकाबरोबर हेलकावे खात होती. दोघेही चालत पुढे आले तसे त्यांना समजले की ते एक बुजगावणे होते.

"अरे च्यायला हे बुजगावन हित कस", प्रमोद शंका उत्पन्न करीत म्हणाला.

"हा हा हा... आर शेतात न्हाय तर काय तुझ्या घरात असणार हे बुजगावन", निलेश हसत म्हणाला.

"आर तस न्हवं, आता ह्या येळला, म्हंजी आजून रोप बी वाडली न्हाईत आन याच काय काम हित", प्रमोदची शंका रास्त होती.

"आर आपल्याला काय करायचं हाय, ठिवल आसल कशाला तरी नायकान", निलेश त्या बुजगावण्याकडे बघत म्हणाला. त्या बुजगावण्याचे तोंड एका पोत्याने बनविले होते. दोन डोळ्यांच्या जागी एक जागा रिकामी होती आणि दुसऱ्या जागी एक हिरवट पांढरा डोळा बसवला होता. बघताना तो अगदी खरा डोळा दिसत होता. तोंड काळ्या धाग्याने शिवले होते. वरकरणी साधारण वाटणार ते बुजगावन निरखून पाहिल्यावर भयावह दिसत होते.

"चल जाऊया हितन", प्रमोद म्हणाला. पण निलेश त्या बुजगावण्याकडे एकटक बघत होता.

"ए निल्या, आर चल की पुढं जायचं हाय अजून", प्रमोद म्हणाला.

"आर ह्या बुजगावण्याकड बगून त्या मास्तराची आठव याय लागली बग", असे म्हणत निलेशने त्या बुजगावण्याच्या तोंडावर एक ठोसा लगावला.

"हहा ... हा ... आर लै भारी वाटतंय बग.. मार तुबी एक ठोसा हाण... च्या मायला", निलेश म्हणाला तसा प्रमोदही पुढे आला आणि त्या बुजगावण्याला एक ठोसा लगावला.

दोघांनीही त्या बुजगावण्याला मारायला सुरुवात केली. बुजगावणे आता जवळपास आडवे झाले होते.

"ए बास र.. त्यो नाईक आला तर आपल्याला आडवं करील, चल हितन", प्रमोद म्हणाला.

"व्हय व्हय, चल जाऊ हितन", बुजगावण्याला हात लावीत त्याला सरळ करीत निलेश म्हणाला.

"आर निल्या.. त्याचा एक डोळा कुठं गेला", प्रमोद म्हणाला.

"हा.. कसला काय... डोळा?",निलेश.

दोघांच्या मारहाणीत त्या बुजगावण्याच्या एक डोळा कुठेतरी पडला होता. दोघांनीही

आजूबाजूला बघितले पण डोळा अर्थात ती पांढरी मोठी हिरवट गोटी कुठेही दिसत नव्हती.

"आर जाऊदे त्यो डोळा.. चल जाऊ हितन", निलेश म्हणाला, आणि दोघेही तेथून लगबगीने निघाले.

पाच वाजून गेले होते. दोघेही नदीवर पोहोचले आणि त्यांनी मासे पकडायला सुरुवात केली. बराच वेळ दोघेही मासे पकडत बसले. वेळेचे दोघांनाही भान राहिले नाही. ढगाळलेल्या आसमंतातून सूर्य कधी डोंगराआड झाला ते दोघांनाही कळले नाही. बघता बघता डोळ्यासमोर अंधार पसरू लागला होता.

"आर ए निल्या बास आता, अंधार पडाय लागलाय लगा, चल घरला जाय पायजे", प्रमोद म्हणाला.

दोघांनीही छोटे मोठे बरेचसे मासे पकडुन एका प्लास्टिकच्या पिशवीत भरले होते.

"व्हय व्हय पम्या... चल जाऊ आता, लै पकडल्यात मास"

दोघेही तेथून निघाले. पाठीवरील दप्तर आणि हातातील माश्यांची पिशवी सांभाळत दोघेही तेथून चालत आल्या वाटेनं निघाले. संध्याकाळचे सात वाजून गेले होते. बारीक रिमझिम पाऊस सुरू होता. दोघेही चालत रंगा नाईकाच्या शेताजवळ आले. शेतातून जाणारी वाट दहा पंधरा मिनिटे वाचवणारी होती. तर उजवीकडे जाणारा रस्ता लांबचा पडत होता.

"पम्या... चल आल्या वाटणच जाऊया... पटपट जाऊया", निलेश म्हणाला.

"आर... पर सांज झालिया दोगच या आडवाटेन जायचं म्हंजी...", प्रमोद बिचकत म्हणाला.

"आर काय घाबरतुयास लगा... मी हाय न्हवं.. चल", असे म्हणत निलेशने प्रमोदला पुढे खेचले. दोघेही शेतातून पुढे चालत आले. नायकाचे शेत बरेच मोठे होते. मुख्य रस्त्यावर जायला दोन तीन वाटा जात होत्या.

"पम्या चल त्या बुजगावण्याकड जाऊन बघूया.."

"ए बाबा गप गुमान चल या वाटन तिकडं नगो ह्या येळला"

"आर ही वाट लांब पडतीया लगा.. चल हितन पटपट", असे म्हणत निलेश त्या वाटेने पुढे गेला. त्याच्या मागोमाग प्रमोदही गेला.

दोघेही चालत अर्ध्या वाटेपर्यंत आले. दुरूनच दोघांचीही नजर त्या बुजगावण्याच्या जागेवर खिळली होती. दोघेही त्या जागी आले पण...

आता ते बुजगावणे त्या जागी नव्हते...

दोघेही क्षणभर चपापले.

"आर ते बुजगावन कुठं गेलं", प्रमोद घाबऱ्या आवाजात म्हणाला.

"आर गेलं आसल त्याचा डोळा शोदाय...", असे म्हणत निलेश खो खो हसू लागला, पण

प्रमोद स्तब्ध उभा होता. त्याच्या मनाला एक अनामिक भीती चाटून गेली होती.

"ए निल्या बाबा, चल हितन लवकर मला लै भ्या वाटाय लागलंय आता", प्रमोद म्हणाला.

"बर बाबा चल जाऊया"

दोघेही त्या शेतातून चालत बाहेर आले आणि मुख्य रस्त्याला लागले.

मागे त्या विस्तीर्ण शेतात कुठेतरी खसखसत काहीतरी चालत होते. अर्धवट वाढलेल्या त्या रोपांमधून आडवे तिडवे चालत ते काहीतरी शोधत होते... काय शोधत होते ते...

नीलेश आणि प्रमोद दोघेही आपापल्या घरी पोहोचले. उशिरा घरी आल्याबद्दल दोघांनाही चांगलाच ओरडा बसला होता.

बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. रात्रीचे दीड वाजून गेले होते. खिडकीजवळ झोपलेल्या निलेशला कसलीतरी चाहूल लागली आणि त्याची झोप चाळवली. घरातील सर्वजण शांत झोपले होते. खिडकीबाहेर कसलीशी खसखस होत होती. निलेश अंथरुणातून उठून बसला. त्याने खिडकी हळूच उघडली. बाहेर काळामिट्ट अंधार पसरला होता. अंधुक प्रकाशात त्याला व्हरांड्यात काहीतरी दिसले. फाटक्या मळकट कपड्याचे, पोत्याने शिवलेल्या गोल तोंडाचे ते काहीतरी शोधत होते. ते पाहून निलेशच्या छातीत धस्स झाले. पोटात गोळा आला, गळ्यात आवंढा दाटला, ओरडण्याचा त्याने प्रयत्न केला पण आवाज गळ्यात अडकला होता. अंग थरथर कापू लागले होते. बाहेर जे काही होते त्याने आता मान हळू हळू निलेशच्या दिशेने वळवली होती. निलेश थरथरत त्या आकृतीकडे पाहत होता.

ते आता हळू हळू सरकत पुढे आले होते. मुसळधार पावसात चिंब भिजलेले त्याचे शरीर जड पावलांनी पुढे पुढे चालत येत होते. काही क्षणातच ते खिडकीजवळ येऊन पोहोचले.

निलेश पुतळ्याप्रमाणे त्याच्याकडे पाहत राहिला होता. त्याच्या डोळ्यांच्या जागी असलेल्या खोल काळ्या रित्या विवरात त्याची मती गुंग झाली होती. ते पुढे आले, खिडकीतून त्यांने आपला हात पुढे केला आणि गजांमधून हात आत सरकावत त्याने नीलेशच्या चेहऱ्याला स्पर्श केला. भिजलेल्या त्या थंडगार स्पर्शाने निलेशच्या अंगात शिरशिरी उठली.

निलेश मोठ्याने किंचाळला. घरातील सर्वजण जागे झाले, घरातील दिवा लागला, त्यांनी निलेशकडे पाहिले. निलेशच्या अंगावर थेंब थेंब रक्त सांडत होते. डोळ्यातील खोबणीतून ते रक्त सांडत होते. निलेश खाटेवर आडवा बेशुद्ध पडला होता. त्याचा एक डोळा नाहीसा झाला होता आणि खिडकी सताड उघडी होती.

उद्याचा दिवस उजाडला होता. निलेशच्या बाबतीत घडलेली गोष्ट गावभर पसरली होती. प्रमोदलाही निलेशबद्दल कळले, ते ऐकून प्रमोदच्या पायाखालची जमीनच सरकली, अंगात ताप भरून आला पण त्याने काल घडलेल्या गोष्टीबद्दल कोणालाही काहीच सांगितले नाही.

प्रमोद आठवडाभर शाळेत गेला नाही, निलेश तालुक्याच्या एका खाजगी रुग्णालयात भरती झाला होता. घडून गेलेल्या त्या विपरीत घटनेचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला होता आणि डोळ्यासोबत त्याची वाचाही जणू गडप झाली होती.

रंगा नाईकाच्या शेतातून तीन शाळकरी मूल चालत निघाली होती, रिमझिम पाऊस पडत होता. दूरवरून त्यांना कोणीतरी दिसले, पावसात स्तब्ध उभे, अंगात फटका शर्ट आणि पायात वाऱ्यावर झुकणारी मळकट प्यांट. तिघेही त्याच्या जवळ पोहोचले. ते एक बुजगावणे होते. तोंड पोत्याने बांधले होते. दोन डोळ्यांच्या जागी एक जागा रिकामी होती आणि एका जागी एक घारा पांढरा पाणीदार डोळा होता... अगदी खराखुरा डोळ्यासारखा... नुकताच बसवलेला...

बळी

१९९० चा काळ होता. मोरेश्वर नावाचा एक गरीब तरुण कोकणातल्या एका छोट्याशा गावात राहत होता. घरात दारुडा बाप, आजारी आई आणि अठरा विश्व दारिद्र्य अशी स्थिती होती. मोठी बहीण लग्न करून सहा महिन्यांपूर्वी सासरी नांदायला गेली होती. नाही म्हणायला तिच्या सासरकडूनही हुंड्यासाठी सारखी पत्र येत. एक दोनदा तर तिचा नवरा तिला माहेरी सोडून गेला होता आणि पैशासाठी भांडून गेला होता. कसेतरी मनधरणी करून आणि थोडे पैसे देऊन तिला परत त्याच्यासोबत सासरी पाठवले होते.

मोरेश्वरला एक लहान भाऊ होता. त्याचे नाव गिरीधर, गिरीधर चौदा वर्षाचा होता.

मोरेश्वर गावातील पडेल ती कामं करायचा. मोरेश्वरला विडीकाडी किंवा दारूचे व्यसन नव्हते. मित्र परिवारही छोटासाच होता. त्याचा एक मित्र होता हनमंत. हनमंत मासेमारी करायचा. मोरेश्वर त्याच्यासोबत कधीकधी समुद्रात मासे पकडायला जायचा. पकडलेले मासे ते दोघे बाजारात विकायचे. हनमंत मोरेश्वरला थोडेफार पैसे द्यायचा.

एक दिवशी असच मोरेश्वर हनमंतसोबत मासे पकडायला समुद्रवर गेला होता. आज त्यांनी थोडे वेगळे ठिकाण निवडले होते. मोरेश्वराने जाळे समुद्रात टाकले. काही वेळातच जाळे जड झाल्यावर मोरेश्वराने जाळे भरभर वरती खेचले. जाळ्यात छोटे मोठे बरेच मासे सापडले होते.

मोरेश्वराने मासे एका बादलीत टाकायला सुरुवात केली आणि टप आवाज करीत काहीतरी बादलीत पडले. मोरेश्वराने बादलीत पाहिले. बादलीत एक काळीकभिन्न मूर्ती पडली होती. मोरेश्वरने ती मूर्ती बादलीतून बाहेर काढली आणि पाहू लागला. हाताच्या तळव्या एवढी ती छोटीशी मूर्ती होती. छोटी असली तरी अगदी बारीक कोरीवकाम केलेली ती मूर्ती आखीव रेखीव मढवलेली होती. त्या मूर्तीचे डोळे लालभडक होते. केस लांबसडक होती, लालभडक जीवनितून दोन पांढरे सुळे स्पष्ट दिसत होते. मोरेश्वर आश्चर्याने त्या मूर्तीकडे पाहत बसला होता. मोरेश्वरला ती मूर्ती काहीशी विचित्र वाटली.

"काय झालंय मोऱ्या, ते हातात काय पकडला हा", हनमंताने विचारले.

"अरे हे बघ, ही मूर्ती घावलान माका", मोरेश्वर म्हणाला.

हनमंताने ती मूर्ती आपल्या हातात घेतली, त्याने ती आडवी तिडवी करून पाहिली.

"बापरे ही असली कसली मूर्ती असा मोऱ्या, तुका घावली असा, तू ठेव तुझ्याजवळ", असे म्हणत हनमंताने ती मूर्ती मोरेश्वरकडे दिली.

मोरेश्वराने त्या मूर्तीकडे एकवार पाहिले आणि म्हणाला, "मला तर भीती वाटतला बाबा, हिला

सोडून देतो परत पाण्यात".

हनमंताने फक्त मान होकारार्थी हलवली आणि मोरेश्वराने ती मूर्ती अलगद पाण्यात सोडून दिली.

दोघेही बराच वेळ समुद्रात मासे पकडत बसले होते. उन्हाचा चटका बसू लागला, तेव्हा दोघांनीही मासे पकडायचे थांबवून परत माघारी फिरले. आज त्यांना बरेच मासे सापडले होते. दोघांनी ते मासे बाजारात नेऊन विकले, हनमंताने आज चांगली कमाई केली, खुश होऊन त्याने मोरेश्वरला पन्नास रुपये दिले, पन्नास रुपये पाहून मोरेश्वर खूप खुश झाला.

संध्याकाळ झाली तशी दोघंही आपापल्या घरी आली. दिवसभरात मोरेश्वराची बरीच दमछाक झाली होती. घरी येईपर्यंत रात्रीचे आठ वाजले. घरी आल्या आल्या मोरेश्वराने आईच्या हातावर पन्नास रुपये ठेवले. पन्नास रुपये पाहून मोरेश्वराची आई खूप आनंदी झाली. तिने ते पैसे देवापुढे ठेवले आणि मोरेश्वरला जेवायला वाढले.

"आई आज हनमंत बरोबर मासे पकडायला गेलो होतो, आज खूप मासो घावलो", मोरेश्वर म्हणाला.

"असाच काम कर मोरू, आणि एक दिवस स्वतःचा धंदा सुरू कर"

"होय, अरे एक सांगायचं राहूनच गेलो, अगो आज मास पकडताना एक मूर्ती घावली माका", मोरेश्वर म्हणाला.

"मूर्ती घावली, खय समुद्रात"

"होय, पण देवी जरा कडक दिसत असा, कोणत्या देवीची हा माहीत नाही, मी ती परत पाण्यात सोडून दिलय", मोरेश्वर म्हणाला.

नंतर आवरा आवर करण्याच्या नादात मोरेश्वर मूर्तीबद्दल पूर्ण विसरून गेला. रात्री दहानंतर सर्वजण झोपी गेले. दिवसभराच्या धावपळीमुळे मोरेश्वरला लगेच झोप लागली.

मध्यरात्रीच्या सुमारास केव्हातरी मोरेश्वरला जाग आली. मोरेश्वर लघुशंका करण्यासाठी उठला. तो मागच्या दारातून बाहेर आला. घराच्या मागे एक छोटीशी विहीर होती. रात्रीचा चांदण्यांचा अंधुक निळसर उजेड पसरला होता. बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते. मोरेश्वर सवयीप्रमाणे पुढे चालत गेला. लघुशंका करून तो माघारी फिरला, आणि परत येताना त्याला अंधुक प्रकाशात काहीतरी दिसले. मोरेश्वर जागीच थबकला.

विहिरीजवळ त्याला दोन बारीक चमकणारे डोळे दिसले. लालभडक डोळे. मोरेश्वर दबकत पुढे आला तसे त्याला दिसले की ती एक छोटी मूर्ती होती, ती तीच मूर्ती होती जी त्याला समुद्रात सापडली होती. मोरेश्वर आ वासून त्या मूर्तीकडे पाहत राहिला. काय करावे त्याला काही सुचले नाही. त्याला जाणवले नकळत आपल्या अंगाला एक कंप सुटला आहे. उराची धडधड वाढत होती. मोरेश्वर धावतच आत गेला आणि त्याने आईला झोपेतून जागे केले. तो आईला घेऊन घराच्या मागे आला आणि विहिरी कडे असलेल्या त्या मूर्तीकडे गेला, पण आता ती मूर्ती तेथून नाहीशी झाली होती. मोरेश्वर अचंबित झाला.

"अग इथेच ती मूर्ती दिसली माका, खय गेली"

"मोरू अरे, भास झालो असा तुका, चल आत चल आणि शांत झोप", असे म्हणत आई मोरेश्वरला घरात घेऊन गेली.

मोरेश्वर घरात आला पण त्याला माहित होते की त्याला कसलाही भास झाला नव्हता, ती मूर्ती त्याने पाहिली होती, ती विहिरीजवळ होती.

पण ती मूर्ती तेथे कशी आली? मी तर तिला परत पाण्यात सोडून दिले होते. यासारख्या प्रशांनी मोरेश्वरची झोप उडाली होती. पहाटे केंव्हातरी मोरेश्वर झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी मोरेश्वर सकाळी लवकरच हनमंताकडे गेला आणि त्याला काल घडलेल्या प्रकाराबद्दल सविस्तर सांगितले.

"माका तर खूप भीती वाटत हा हनमंता", मोरेश्वर म्हणाला.

"घाबरू नको माझ्या ओळकीचो एक भगत असा, आज संध्याकाळी आपण दोघे जाऊन भेटूया त्येका", हनमंत म्हणाला आणि मोरेश्वर तयार झाला.

संध्याकाळी ठीक सात वाजता मोरेश्वर आणि हनमंत त्या भगताकडे गेले. भगत गावाच्या वेशिजवळ एका शंकराच्या मंदिराच्या मागे राहत होता. दोघेही त्याच्या घरी पोहोचले. भगताचे घर फारसे मोठे नव्हते, त्या घरात तो एकटाच राहत असे. घरात सगळीकडे देवदेवतांच्या मुर्त्या आणि प्रतिमा होत्या.

"या दोघेही बसा इथं पुढे", त्या दोघांना पाहून भगत म्हणाला.

"नमस्कार करतंय बाबा", हनमंत पुढे येत त्याने चरणस्पर्श केले. ते पाहून मोरेश्वरसुद्धा पुढे येऊन पाया पडला. त्या दोघांनाही भागताने खाली बसायला सांगितले तसे दोघेही खाली बसले.

"हह सांगा आता काय काम काढलं असा"

मोरेश्वर ने कालपासून घडलेली सगळी घटना एका दमात सांगितली. भगताने शांत चित्ताने सर्व घटना ऐकून घेतली आणि शेवटी म्हणाला, "समुद्रात घावलेली ती देवी नाही, ती देट्टीदामिनी असा"

"दे देट्टी... दामिनी, म्हणजे काय हा", मोरेश्वरने चाचरत विचारले.

यावर मोठ्याने हसत भगत म्हणाला, "अरे तुझं नशीब उघडलं हा मोऱ्या, नाशीबवंताला घावत असा देट्टीदामिनी, तुझं नशीब चमकलो समज".

मोरेश्वरने काही न कळून एकवार हनमंता कडे पाहिले.

"जरा सविस्तर सांग बाबा, हा मोऱ्या खूप घाबरला हा", हनमंत म्हणाला.

"घाबरायची काही गरज नाही, आता मी सांगतो तस कर, तिच्याकदे जे मागशील ते सर्व तुका

मिळेल", असे म्हणत भगताने मोरेश्वर ला काय काय करायचे ते सांगितले. ऐकता ऐकता दोघांच्याही अंगावर काटा येत होता.

बराच वेळ निघून गेला होता, काही वेळाने दोघेही तेथून निघाले.

मोरेश्वर च्या मनात चलबिचल वाढत होती. भगताने सांगितल्या प्रमाणे केले तर नशीब उघडेल. पण...
तो पण विचारात टाकणारा होता. कारण कोणतीही गोष्ट या जगात सहज आणि फुकट मिळत नाही.

खूप विचार करून शेवटी मोरेश्वर ने भगताने सांगितल्या प्रमाणे करायचे ठरवले. तसेही घरात अठरा विश्व दारिद्र्य भरून होते, कितीही काम केले तरी हाता तोंडाची जुळवणी करायला कष्ट पडत होते. असे कुढत कुढत जगण्यापेक्षा आलेल्या संधीचा फायदा करून घेण्याचे मोरेश्वरने ठरवले.

त्या दिवशी मोरेश्वरने सर्व तयारी करून ठेवली, दूध भात एका भांड्यात काढून घेतला, भगताने दिलेली ती भुकटी आणि एक सुरा त्याने घरात एका ठिकाणी लपवून ठेवला.

मध्यरात्र होती. बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते. मोरेश्वर हळूच जागचा उठला. घरातील सर्व शांत झोपले होते. त्याने सामानाची थैली घेतली आणि घराच्या मागच्या बाजूला आला. त्याने दरवाजा आवाज न करता उघडला. बाहेर शुद्ध चांदणे पसरले होते. मोरेश्वराने बाहेर येऊन दार हळूच लावून घेतले.

मोरेश्वर पुढे विहिरीजवळ चालत आला, त्याला माहित होते मूर्ती त्याच जागी असणार. विहिरीच्या बाजूने चालत तो पुढे आला आणि त्याला दिसले, ती मूर्ती तेथेच होती, शुद्ध चांदण्यात तिचे लालभडक डोळे आणखी गडद झाले होते.

मोरेश्वर त्या मूर्तीसमोर येऊन बसला. त्याच्या हृदयाची धडधड वाढत होती. थरथरत्या हाताने त्याने थैलीतील सामान बाहेर काढले. दूध भात त्याने मूर्तीसमोर ठेवला. सुरा बाहेर काढला आणि उजव्या हाताच्या अंगठ्यावरून फिरवला, अंगठ्यातून भळाभळा वाहणारे रक्त त्याने मूर्तीवर सोडले. दिलेली भुकटी त्याने हातात घेतली आणि डोळे बंद करून तो दबक्या आवाजात भगताने सांगितलेला मंत्र म्हणू लागला.

काही क्षणातच त्याला लप लप असा आवाज आला. कोणीतरी काहीतरी खात असल्याचा. मोरेश्वराची भीतीने गाळण उडाली. त्याने घाबरत डोळे उघडून पाहिले आणि बघतो तर समोरील दूध भात नाहीसा झाला होता. त्या मूर्तीच्या डोळ्यातून लालभडक प्रकाश बाहेर पडत होता. आणि पुढे एक आवाज त्याच्या कानी पडला.

"बोल... माणसा... काय हवंय तुला... मला समुद्रातून का बाहेर काढलंस... बोल"

"म म माफ कर माते, माझी एक इच्छा आहे..."

"सांग काय इच्छा आहे तुझी... लवकर सांग"

"म माझ्या बापाची दारू सोडव, माझ्या बापाला निर्व्यसनी कर"

"ईच्छा छोटी, भार छोटा, उद्या जिवंत कोंबड समुद्राला अर्पण कर... तुझी कामना पूर्ण होईल..."

मोरेश्वर ते ऐकून खुश झाला.

"मला आता मुक्त कर, समुद्रात पुन्हा सोडून ये"

हे ऐकताच मोरेश्वरला भगताने सांगितले ते आठवले. तो म्हणाला.

"देट्टीदामिनी माझ्या आणखी काही इच्छा असा, त्या पूर्ण झाल्या की मी तुला पुन्हा समुद्रात सोडून देईन", मोरेश्वर म्हणाला.

"ठीक आहे पण तुझ्या आणखी चारच इच्छा मी पूर्ण करेन, त्यानंतर मला समुद्रात मुक्त करावेच लागेल"

मोरेश्वरने हात जोडले आणि मूर्ती अदृश्य झाली.

दुसऱ्या दिवशी मोरेश्वर दिवसभर बाहेर होता. हनमंताच्या मदतीने त्याने एक जिवंत कोंबडे समुद्राला अर्पण केले होते. संध्याकाळी उशिराच घरी परतला. तेव्हा त्याने पाहिले की त्याच्या बाप आज घरीच होता. नेहमीप्रमाणे तो आज दारूच्या गुत्त्या वर गेला नव्हता.

"बाबा आज घरी, गुत्त्यावर गेला नाहीस"

"नाही रे मोऱ्या, काय झालाव कळत नाही, मेलो दारूचा घोट आता घशाखाली जात नसा, दारू आता बंद करत हा मी"

हे ऐकून मोरेश्वर ला कोण आनंद झाला. त्याची इच्छा पूर्ण झाली होती. मोरेश्वरला आता विश्वास बसला होता की देट्टीदामिनी त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करणार. मोरेश्वर अगदी खुशीत होता.

त्यानंतर मोरेश्वरच्या आणखी काही छोट्या मोठ्या इच्छा पूर्ण झाल्या. प्रत्येक वेळी मोरेश्वरला समुद्राला काही ना काही अर्पण करावे लागत होते.

बापाची दारू सुटली होती, तो काम धंदा करू लागला होता, बहिणीच्या सासर कडून पैशांची मागणी थांबली होती, ती आता सुखाने संसार करत होती, छोट्या भावाला शाळेत फी माफी मिळाली होती. सर्वकाही सुरळीत चालले होते.

त्या दिवशी मोरेश्वरने ठरवले की आज काहीतरी मोठे मागायचे, तसेही ही शेवटची इच्छा होती, पण मोठे काही मागितले तर त्याचा परतावाही मोठा असणार होता. त्याने बराच वेळ विचार केला आणि काय मागायचे ते ठरवले.

मध्यरात्र होती, मोरेश्वर अंथरुणातून उठला, घरचे सर्व गाढ झोपेत होते, तो घराच्या मागे आला, विहिरी जवळ त्या मूर्तीसमोर बसला. दूध भात मूर्तीसमोर ठेऊन नेहमीप्रमाणे विधी केली, देट्टीदामिनी जागृत झाली.

"बोल तुझी शेवटची इच्छा"

"माका या गावातील सर्वात श्रीमंत माणूस व्हायचे हा, माझी इच्छा पूर्ण कर, माझं घर पैशाने, सोन्या नाण्याने भर", मोरेश्वर म्हणाला.

"उद्या दुपारी ठीक बारा वाजता समुद्रात जाळे टाक, जाळ्यात तुला सोन्या नाण्यांनी भरलेला मोठा हंडा मिळेल"

हे ऐकून मोरेश्वर आनंदी झाला, त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि पुढे देट्टी दामिनी म्हणाली.

"इच्छा मोठी, परतावा मोठा, उद्या रात्री ठीक बारा वाजता, एक जिवंत मानवी नर समुद्राला अर्पण करावा लागेल"

हे ऐकून मोरेश्वरच्या पायाखालची जमीन सरकली. पुढे तो काही बोलणार इतक्यात मूर्ती समोरून नाहीशी झाली. मोरेश्वर घरात येऊन अंथरुणात आडवा झाला, काय करावे काही सुचत नव्हते. देट्टीदामिनी ने सांगितल्याप्रमाणे सोन्या नाण्याने भरलेला हंडा मिळेल पण जिवंत मानवी नर कुठून अर्पण करू. रात्रभर मोरेश्वर विचार करीत राहिला, काही केल्या त्याला झोप लागेना, एकीकडे सोन्या नाण्याने भरलेला हंडा दिसत होता आणि दुसरीकडे तो भयंकर परतावा, एक नरबळी.

दुसऱ्या दिवशी सकाळी मोरेश्वर हनमंताकडे गेला.

"हनमंता दुपारी ठीक बारा वाजता समुद्रात जायचं हा, एक मोठं काम असा"

"काय रे मोऱ्या, समुद्रात अस काय काम हा"

"सगळं सांगतो पण आता नाही, दुपारी बारा वाजता तुला कळेलच"

मोरेश्वर आणि हनमंत दोघांनी बोट काढली आणि समुद्रात खोलवर गेले. दुपारी ठीक बारा वाजता मोरेश्वरने जाळे समुद्रात फेकले, काही वेळातच जाळे जड लागले आणि मोरेश्वरने जाळे भरभर वरती ओढून घेतले. जाळ्यात एक मोठा हंडा होता. ते पाहून दोघेही अचंबित झाले.

मोरेश्वरने जाळ्यातून हंडा बाहेर काढला, हंड्याचे झाकण त्याने उघडले आणि आत पाहिले, हंड्यात सोने, चांदी, हिरे, मोती भरले होते, ते पाहून मोरेश्वर आणि हनमंताचे डोळे दिपले.

"मोऱ्या अरे हे येवडो सोन चांदी"

"होय हनमंता, आणि यातला तुला पाव हिस्सा मी देणार"

हे ऐकून हनमंत खूप आनंदी झाला. त्याला आपल्या कानांवर विश्वास बसला नाही.

"खरच मोऱ्या, यातलो पाव हिस्सा तू माका देणार हा"

"होय, पण त्या आदी माझं एक काम करूचा लागेल, आज रात्री बारा वाजता बोट घेऊन माझ्यासोबत समुद्रात याव लागेल"

मागचा पुढचा विचार न करता, हनमंत लगेच तयार झाला.

दोघेही समुद्रकिनारी आले, सोबत आणलेला हंडा दोघांनी लपतछपत एका रानात घेऊन आले, तेथे मोरेश्वरने पाव भाग काढून एका कापडी पिशवीत बांधला आणि बाकीचे धन दुसऱ्या एका जाड पोत्यात भरून घेतले.

"हनमंता हा पाव हिस्सा तुज्या वाट्याचा, पण आज रात्रीच काम झाल्यावरच तुला मिळतलो"

"होय मोऱ्या चालेल", हनमंत हर्षभरीत होत म्हणाला.

दोघेही त्या जागेतून बाहेर पडले. हनमंताला पुसटशीही कल्पना नव्हती की आज रात्री बारा वाजता काय घडणार आहे.

मोरेश्वर लपतछपत घरी पोहोचला. घराच्या आसपास कोणी नसल्याची खात्री करून तो मागच्या दारी आला आणि ते मोठे पोते त्याने विहिरीत ढकलले. हणमंताचा हिस्सा त्याने त्याच्यासोबत ठेवला.

दिवसभर मोरेश्वर काही जेवला नाही की काही खाल्लं नाही, संध्याकाळी आईच्या आग्रहा खातर त्याने दोन घास कसेबसे पोटात ढकलले. रात्री दहानंतर निजानीज झाली. रात्री ठीक सव्वा अकरा नंतर मोरेश्वर जागचा उठला. मागच्या अंगणात आला, विहिरीपाशी मूर्ती होती ती मूर्ती त्याने उचलली आणि मार्गस्थ झाला.

समुद्र किनाऱ्यावर हनमंत बोटीसोबत वाट पाहत बसला होता. मोरेश्वर तेथे पोहोचला आणि दोघेही बोटीने समुद्रात गेले. काही वेळातच दोघेही दूरवर समुद्रात पोहोचले. त्याच ठिकाणी जेथे मोरेश्वरला ती मूर्ती सापडली होती.

मोरेश्वर मूर्ती हातात घेऊन खाली बसला होता. दोघेही आतापर्यंत एक चकार शब्दही बोलले नव्हते. हनमंताने बोट स्थिर केली. मोरेश्वर जागचा उठला, बाजूला ठेवलेला हणमंताचा हिस्सा त्याने त्याच्या हातात दिला.

"हनमंता मित्रा, या दौलतीच्या बदल्यात देट्टीदामिनी ने परतावा मागितला हा"

"परतावा... कसला", हनमंत साशंक होत म्हणाला.

"बळी, नरबळी"

हे ऐकताच हनमंत उभ्या उभ्या कोलमडला.

"काय ब ब बळी... नरबळी"

"होय हनमंता पण घाबरू नको, आज बळी माझा जाणार, मी स्वतःला समुद्राला अर्पण करणार, पण माझ्या घरी याबद्दल काहीच सांगूच नाय, समजलं हनमंता"

हनमंत मोरेश्वर कडे पाहताच राहिला. त्याला काय बोलावे काही सुचलेच नाही.

मोरेश्वर मूर्ती हातात घेऊन एक एक पाऊल मागे सरकला, बोटीच्या कडेला त्याच्या पाय थडकला आणि मोरेश्वर मूर्तीसह पाण्यात पडला.

हनमंत डोके पकडून बराच वेळ त्या अथांग सागरात त्याच्या बोटीत बसून राहिला.

दोन दिवस निघून गेले, सकाळची कोवळी किरण समुद्र किनाऱ्यावर पडली होती. एक माणूस त्याचे मासे पकडायचे जाळे खांद्यावर घेऊन समुद्राच्या किनाऱ्यावरून चालला होता. त्याला दुरूनच समुद्राच्या फेसाळत्या पाण्यात एक मुलगा आडवा पडलेला दिसला. तो धावतच त्याच्या जवळ गेला, ओणवा पडलेल्या त्या मुलाला त्याने सरळ केले आणि पाहिले. तो मोरेश्वर होता. मोरेश्वर जिवंत होता. त्या कोळ्याने मोरेश्वरला आणखी काही माणसांच्या मदतीने उचलले आणि घरी आणले. दोन दिवस औषध पाणी घेतल्यावर मोरेश्वर बरा झाला.

मोरेश्वरच्या घरी शोककळा पसरली होती, त्याच्या घरी त्याचे आई वडील भाऊ आणि काही पाहुणे जमले होते. दुपारची वेळ होती. मरण शांतता पसरलेल्या त्या घरात कोणीतरी आले. मोरेश्वरच्या आईने दाराकडे पाहिले आणि पाण्याने डबडबलेल्या डोळ्यात चमक आली. दारात मोरेश्वर आला होता.

मोरेश्वरला पाहून त्याचे आई वडील भाऊ बहीण खूप आनंदी झाले. मोरेश्वराच्या घरी आनंद पसरला.

हनमंत आणि मोरेश्वर समुद्र किनारी बसले होते.

"मोऱ्या अरे एवढ्या खोल समुद्रात पडून तू जिवंत राहिलास, कसा काय", हनमंताने आश्चर्याने विचारले.

मोरेश्वर हसला आणि म्हणाला, "हनमंता तुला माहीत हा, मी शेवटची इच्छा काय मागितली होती"

"काय", हनमंताने उत्सुकतेने विचारले.

"माका या गावचो सगळ्यात श्रीमंत माणूस व्हायचा आसा", मोरेश्वर हसत म्हणाला, त्याच्या डोळ्यात एक वेगळीच चमक होती.

आडवाटेची ब्याद

शशांकने निघायची सर्व तयारी केली. एक मोठी ब्याग उचलत त्याने गाडीची किल्ली उचलली आणि घराबाबाहेर पडला. दुपारचे दोन वाजले होते. शशांक त्याच्या सासरी निघाला होता. त्याच्या बायकोची कालच डिलिव्हरी झाली होती, त्याला मुलगा झाला होता.

जवळपास पाचशे किलोमीटरचे अंतर कापायचे होते. पोहचेपर्यंत रात्र नक्की होणार हे त्याला माहित होते. पेट्रोलची टाकी त्याने कालच फुल करून ठेवली होती. तो गाडीत बसला आणि चावी फिरवून गाडी सुरू केली.

गाणी ऐकत सावकाश गाडी चालवत तो महामार्गाला लागला. वातावरण फारसे उष्ण नव्हते, हवेत गारवा होता, त्यामुळे त्याने गाडीची काच उघडी ठेवली होती. मजल दरमजल करीत त्याची गाडी निघाली होती. शशांक आता शहराबाहेर पडला होता. दुपारचे पाच वाजून गेले होते. वाटेत छोटी मोठी गाव दिसत होती. आणखी थोडावेळ ड्राइव्ह केल्यावर तो एका छोट्या टपरीवर चहा पिण्यासाठी थांबला. तेथे दोन तीन माणसं चहा पीत बसली होती.

"एक चहा द्या", एका बाकड्यावर बसत शशांक म्हणाला.

चहा पीत शशांक थोडा वेळ निवांत बसला होता.

"कुठं निघालात पावण", बाजूला बसलेल्या एकाने विचारले.

"ह... मी... मी शिरधनला चाललो आहे", शशांक म्हणाला.

"शिरधनला... लै लांबचा पल्ला हाय की, एक काम करा... उजवीकडन गावात शिरा. सरळ रस्ता पकडून जायचं, शेवटच्या टोकाला गाव संपलं की मुरुंदी गावाच्या दिशेनं जायचं, मुरुंदी गाव आल की कोणालाबी इचारा शिरधनचा रस्ता", तो इसम म्हणाला.

"अहो पण हा मार्गपन तिकडेच जातो, मग कशाला मी या दुसऱ्या वाटेने जाऊ", शशांक चहाचा शेवटचा घोट संपवत म्हणाला.

"आवो पावन, या वाटणं गेलात तर संबर सव्वाशे किलोमीटर अंतर कमी पडतया, जास्त कोणाला म्हायती न्हाय, रास्ताबी चांगला हाय, व्हय का न्हाय राम्या", बाजूच्या आणखी एका इसमाला हाताच्या कोपराने ढोसत तो इसम म्हणाला. तसा तो दुसराही थोडा चाचरत म्हणाला, "व्हय पर.. बगा म्हंजी तुमच्याव हाय, सांजबी होत आली आन, रस्ता जरा आडवाटचा हाय पर संबर एक किलुमिटर अंतर वाचतय ते खरं हाय".

त्या दोघांचे बोलणे ऐकून शशांक थोडा विचारात पडला. त्याने त्याचा मोबाईल काढला आणि

म्याप उघडून त्याने शिरधन चा रस्ता बघितला तेव्हा त्याला दिसले की खरच शिरधन ला जाण्यासाठी दोन पर्यायी मार्ग होते आणि दुसऱ्या मार्गाने एकशे दहा किलोमीटर अंतर वाचणार होते. ते पाहून शशांक म्हणाला, "अरे वा खरच या रोडने मला लवकर पोहोचता येईल, धन्यवाद दादा.. धन्यवाद", त्या इसमाचे शशांकने आभार मानले आणि तो गाडीत येऊन बसला.

शशांक तेथून गेल्यानंतर त्या दोघांतील एकजण म्हणाला, "आर खुळा हायस का.. कशाला त्या माणसाला त्या वाटेनं जाय सांगितलंस... तुला म्हाइत न्हाय का त्या वाटला ती ब्याद हाय ते".

"आर गप, असल्या गोष्टीनंच आपली गावं बदनाम व्हाय लागलियात, काय होत न्हाय", तो त्याला गप्प करीत म्हणाला.

'आर पर आज अवस हाय', तो दुसरा इसम मनातल्या मनात म्हणाला.

इकडे शशांकने त्याची गाडी उजवीकडे वळवली आणि तो त्या दुसऱ्या पर्यायी मार्गाने निघाला. संध्याकाळचे साडे पाच वाजले होते. शशांकने त्याच्या मोबाईलमधील म्याप सुरू ठेवला होता त्यामुळे त्याला गाडी थांबवून कोणालाही रस्ता विचारण्याची गरज नव्हती. मनोमन शशांक अगदी खुश झाला होता कारण त्याला लवकर त्याच्या बायको आणि मुलाकडे पोहोचता येणार होते. आणखी तासभर ड्राइव्ह केल्यानंतर तो मुरुंदी गावाजवळ पोहोचला होता. हिवाळ्याचे दिवस असल्याने सूर्यास्त लवकर झाला होता. वातावरण सवाकाश गडद झाले होते.

मुरुंदी गावाच्या कमानीपासून दोन वेगवेगळे रस्ते जात होते. शशांकने कमानीला वळसा मारत दुसरी वाट पकडली आणि तो पुढे गेला. रस्ता फारसा मोठा नसला तरी अगदी ओबडधोबडही नव्हता. शशांक सावकाश ड्राईव्ह करीत पुढे निघाला. रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती, आजूबाजूला मोठमोठी झाडं झुडपं होती. शशांक जसजसा पुढे जात होता आजूबाजूचा परिसर घनदाट होत चालला होता. बराच वेळ शशांकला त्या रस्त्यावर एकही दुसरी गाडी दिसली नव्हती याचे त्याला थोडे आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. शशांकने पेट्रोल चेक केले, गाडीत आता पाव टाकी पेट्रोल शिल्लक दिसत होते.

आणखी थोडे अंतर कापल्यावर त्याला दुरूनच रस्त्याला लागून एक छोटे खोपटे दिसले. निर्जन रस्त्यावर बराच वेळ एकांतात ड्राइव्ह केल्यावर ते छोटे खोपटे बघून शशांकला थोडे हायसे वाटले. त्याने तेथे थोडावेळ थांबण्याचा निर्णय घेतला. शशांक त्या खोपट्याजवळ पोहोचला आणि त्याने गाडी थांबविली. त्याने गाडीतूनच एक नजर त्या खोपट्याकडे टाकली आणि त्याची निराशा झाली. तेथे कोणीही नव्हते. शशांक गाडीतून खाली उतरला आणि त्या खोपट्याजवळ आला. ते एक अतिशय जुनाट खोपटे होते. चार बांबू रोवून त्यावर सुकलेल्या गवताचे छप्पर टाकले होते आणि समोरून ते मोकळे होते. शशांक त्या खोपट्यासमोर दोन्ही हात कमरेवर ठेऊन उभा होता. तो विचार करीत होता कि इथे या इतक्या निर्जन स्थळी हे खोपटे कशासाठी बांधले असावे आजूबाजूला एखादे घरही दिसत नाही. त्याची नजर सहज उजवीकडे खाली गेली आणि त्याला दिसले कि एक छोटी पायवाट आत जात होती. त्या पायवाटेवरून त्याने नजर फिरवली ती वाट आत घनदाट जंगलात जात होती.

‘नक्कीच आत एखादी वस्ती असणार, असो आपल्याला पुढे गेलं पाहिजे’, असा विचार करीत शशांक मागे वळला. गाडी उघडून आत बसणार इतक्यात त्याला एक सळसळ ऐकू आली आणि त्यामागोमाग त्याला पैंजणांचा आवाज आला. त्याने दचकून मागे वळून पाहिले. समोरच्या पायवाटेवरून कोणीतरी त्याच्या दिशेने येत होते. ती एक स्त्री होती, अंधाऱ्या काळोख्या रात्री त्या निर्मनुष्य ठिकाणी त्या स्त्रीला पाहून शशांक मनातून काहीसा चरकला. ती स्त्री त्या खोपटाजवळ आली तिच्या हातात एक कापडी पिशवी होती. तिने अंगात हिरवी साडी नेसली होती. ती सडसडीत बांध्याची विशीतली तरुणी होती. गव्हाळ रंगाची, लांब नाकाची ती स्त्री शशांकला पाहून दचकली. खांद्यावरील पदराचे एक टोक खेचत तिने तोंडावर धरले आणि ती त्याच्याकडे पाहत उभी राहिली. शशांकही काहीक्षण काही न बोलता तिच्याकडे पाहत राहिला.

“कोण पावन”, ती म्हणाली.

“आ… मी… मी शिरधनला निघालो आहे, गाडीतले पेट्रोल संपत आले आहे म्हणून…”, शशांक पुढे काही बोलणार इतक्यात ती स्त्री धडधडत हसली आणि म्हणाली, “आवो, या वाटला दूरपातुर एकबी पंप गावायचा न्हाय तुमास्नी”.

“पण तुम्ही…इथे या ठिकाणी… म्हणजे या निर्जन ठिकाणी या वेळेला एकट्याच कशा”, शशांकने चाचरत विचारले.

“मी… मी तर हितच रहाते, हितच म्हंजी आत आमचं गाव हाय”

पुढे काय बोलावे शशांकला सुचत नव्हते तेव्हा ती म्हणाली, “सायेब.. तुमाला एक सांगू”

“हो हो सांगा ना”, शशांक म्हणाला.

“रात लई झालिया, आता पुढं जाल तर पेट्रोल मिळायचं न्हाय, उगा कुठंतरी अडकून पडाल, तव्हा आजची रात आमच्या गावात काडा आन… उद्या सकाळी जा पुढं… माजा नवरा मदत करील तुमास्नी”, ती म्हणाली.

शशांक विचारात पडला होता, ‘हि बाई म्हणते तस पुढे मला पेट्रोल मिळाले नाही तर खूप मोठी पंचाईत होईल, पुढे एखादे गाव असले तर ठीक नाहीतर’, असा विचार करत असतानाच ती स्त्री पटकन हसत म्हणाली, ‘आवो पुढं दूरदूर पातूर एकबी गाव न्हाय’.

आणखी काही विचार न करता शशांक म्हणाला, “तुम्ही म्हणता ते बरोबर आहे पण तुमच्या घरच्यांना चालेल मी थांबलेलं”.

“आवो, त्याची कायबी काळजी करू नगा, आमच्या गावात बऱ्याच येळेला अशी वाट चुकलेली मानस येत्यात”, ती म्हणाली.

“ठीक आहे, आपल्याला गाडीने जाता येईल का तुमच्या वस्तीपर्यंत”, शशांकने विचारले.

“गाडी न्हाय जायची तितपातूर, चालत जावं लागल, पुढं आड हाय”, ती म्हणाली.

“ठीक आहे मी माझी ब्याग घेतो आणि गाडी एका बाजूला लावतो”, शशांक गाडी उघडत

म्हणाला ती काहीही न बोलता स्तब्ध उभी होती.

शशांकने त्याची ब्याग घेतली आणि तो तिच्यासोबत त्या चिंचोळ्या पायवाटेने चालत निघाला.

आजूबाजूला छोटीमोठी झाडझुडुप होती. मिट्ट काळोख पसरला होता. आकाशात एकही चांदणी दिसत नव्हती. त्या भयाण परिसरात फक्त त्या स्त्रीच्या पैंजणांचा आवाज येत होता. न राहवून शशांकला सारखे वाटत होते की आपण काही चूक तर करीत नाही आहोत ना. ती स्त्री काहीही न बोलता झपझप चालत होती. शशांक तिच्या मागून चालत होता.

थोडे पुढे चालून गेल्यावर समोर एक छोटा ओढा लागला. ओढ्यात उथळ पाणी खळाळत होते. ओढा उतरून त्या पाण्यातून दोघेही हळूहळू चालत होते. शशांकने त्याच्याजवळ असलेला टॉर्चचा झोत खाली पाडला आणि त्या प्रकाशात त्याला दिसले. समोरच्या त्या स्त्रीचे पाय उलटे होते. ते पाहून शशांक जागच्या जागी थबकला. त्याच्या काळजात चर्रर्रर्र झाले. अंगाचे पाणीपाणी झाले, उभ्या उभ्या त्याला भोवळ येऊ लागली. शशांकचा पाय पुढे पडेना झाला आणि इतक्यात ती स्त्री जागीच थांबली, तिने हळूच मान मागे फिरवली, शरीर न हलवता. तिचा चेहरा आता पूर्ण बदलला होता. चेहऱ्यावर लाल काळ्या सुरकुत्या पडल्या होत्या, डोळे पूर्ण पांढरे झाले होते.

शशांकच्या हातातील टॉर्च गळून पडला. त्याच्या हृदयात कळ आली, त्याने अस्फुटशी किंकाळी फोडली, डोळे मिटले, त्याला जाणवले आपण खाली पडत आहोत आणि अचानक त्याला एक स्पर्श जाणवला. त्याने डोळे उघडून पाहिले. त्या स्त्रीने त्याला पकडले होते. तिचा चेहरा पूर्ववत झाला होता.

"आवो काय झालं वरडायला, कशाला घाबरलात तुम्ही", ती म्हणाली.

तिच्या त्या थंड स्पर्शातून बाजूला होत शशांक चाचरत म्हणाला, "तुम्ही आता वेगळ्याच दिसत होता, तुमचे पाय उलटे..".

"मला काय भूतबीत समजला काय तुम्ही मला, काय सायेब, गावाकडची गरीब मानस आम्ही, चला या पुढे", असे म्हणत तिने पुन्हा शशांकचा हात पकडला आणि त्याला पुढे खेचले. शशांक धडपडत पुढे चालू लागला.

दोघेही आता ओढा पार करून वरती आले. समोर एक छोटी विहीर होती, त्या पलीकडे पन्नास पावलांवर एक छोटे घर दिसत होते. दिघेही चालत पुढे आले. त्या स्त्रीने घराचा दरवाजा उघडला. आत मध्यभागी एक मिनमिणता दिवा ठेवला होता. तिने शशांकला बसायला एक घोंगडे अंथरले. शशांक शांतपणे तेथे बसला. तिने शशांकला पाणी पिण्यास दिले.

"नाही माझ्याकडे पाणी आहे", असे म्हणत शशांकने आजूबाजूला बघितले आणि इतका वेळ त्याच्या लक्षात आले नव्हते की त्याची ब्याग त्याच्याजवळ नव्हती. त्याचा टॉर्च किव्वा मोबाईलसुद्धा त्याच्याजवळ नव्हता.

"अरे बापरे मघाशी माझी ब्याग त्या ओढ्यात पडली की काय, माझा मोबाईल सुद्धा नाही आहे माझ्याकडे", शशांक जागचा उठत म्हणाला.

"बसा सायेब, उद्या सकाळी आणू ती ब्याग, आता जाऊ नका तिकडं, लै वंगाळ जागा हाय ती", ती हसत म्हणाली.

"म्हणजे, काय बोलताय तुम्ही, आताच तर त्या जागेतूनच आणलं तुम्ही मला", शशांकचा आवाज वर चढला होता.

"रागावू नका सायेब, एकट्या माणसाला ती जागा भूल दाखवती, काय बाय दिसत तिथं", ती गंभीर आवाजात म्हणाली.

"असं मग चला तुम्ही माझ्यासोबत, दोघंही जाऊ", शशांक तावातावाने म्हणाला.

"असं म्हणताय, चला तर मग जाऊया, तुमची ब्याग आणायला", ती थंड आवाजात म्हणाली.

दोघेही घराबाहेर पडले. रात्रीचे किती वाजले होते काही कल्पना नव्हती. मध्येच एखादी कोल्हेकुई कानावर पडत होती. ती स्त्री पुढे चालत होती. विहीर ओलांडल्यावर दोघेही ओढ्याजवळ आले, शशांक ओढा उतरून खाली आला. समोर त्याला काही पडलेले दिसले. गडद अंधारात काही अंदाज येत नव्हता. अडखळत शशांक त्या उथळ पाण्यातून पुढे आला आणि त्याच्या समोर जे पडले होते ते पाहून तो स्तब्ध राहिला.

समोर एक माणूस मारून पडला होता. त्याचे डोळे सताड उघडे होते, जणू मरते वेळी भयंकर काहीतरी पाहिले असावे. तोंडाचा मोठा आ वासला होता. तो अस्ताव्यस्त त्या पाण्यात निर्जीव पडला होता. तो शशांकचा मृतदेह होता.

शशांकने अर्थात मृत आत्म्याने मागे वळून पाहिले. ती स्त्री त्याच्याकडे पाहून गडगडाटी हसू लागली. तिचा चेहरा बदलला होता. डोळे पांढरेफट पडले होते. क्षणात ती सळसळत पुढे आली आणि त्याचा थंडगार हात पकडून पुन्हा ओढ्यापलिकडे घेऊन गेली.

अंजक एक बाहुली

तुम्हाला जर कोणी सांगितले की काहीतरी वाईट घडणार आहे किंवा या ठिकाणी अत्यंत भयंकर गोष्ट आहे, इथे कसलातरी वास आहे, कोणीतरी वावरत तिथे तर तुम्ही त्याठिकाणी फक्त वाईटच गोष्ट शोधता आणि तुम्हाला भयंकर अनुभवच येतात.

पंकजला अंधश्रद्धा, भूत प्रेत, पिशाच्च या गोष्टींचा राग होता, त्याच्यामते या सर्व भाकड कथा किव्वा मूर्ख लोकांनी मूर्ख बनवण्यासाठी रचलेल्या गोष्टी. पंकजचे वाचन बऱ्यापैकी होते. तो त्याच्या मोबाईल वर, लॅपटॉप वर बराच वेळ वाचनात घालवायचा. एकदा लॅपटॉप वर काही शोधत असताना त्याला एका फोरम ची लिंक दिसली. त्या फोरमचे नाव होते भयानुभव. त्याने लगेच त्या लिंकवर क्लिक केले आणि ते फोरम ओपन केले.

त्या फोरम वर बऱ्याचशा लोकांनी त्यांना आलेले भयानक अनुभव लिहिले होते. अगदी हजारो लोकांच्या अनेक लिंक तेथे उबलब्ध होत्या. पंकजने त्यातील एक एक लिंक ओपन करून वाचायला सुरुवात केली.

नव्या घरात राहायला आलेल्या जोडप्याला आलेला अतृप्त आत्म्याचा अनुभव, झपाटलेल्या बाहुल्याचा अनुभव, पछाडलेल्या लोकांचा अनुभव तसेच बऱ्याच जणांनी तर काही काही उपाय तंत्र मंत्रही तेथे लिहून ठेवले होते. अशा अनेक गोष्टी, अनुभव पंकजने वाचल्या. काही काही अनुभव आणि उपाय वाचून तर तो अगदी खो खो हसत बसला. बराच वेळ वाचन झाले होते रात्रीचे बारा वाजून गेले होते. पंकजने त्याचा लॅपटॉप बंद केला आणि तो अंथरुणात शिरला.

पंकज अंथरुणात पडल्या पडल्या विचार करीत बसला होता.

'काय अंधश्रद्धा भरल्या आहेत जगात, काय तर म्हणे एकवीस सुया टोचलेला लिंबू अमावाश्येला लिंबाच्या झाडाला टांगायचा आणि बरोबर एकवीस तासात तुम्हाला तो लिंबू सर्व संकटातून बाहेर काढील. आणखी काय... हा... काळ्या पाटीवर दोन चौकोन काढायचे त्यात ज्वारीचे पीठ ठेवायचे आणि त्याला बोलवायचे... काय नाव लिहिले होते बर... हा... जखर... तर त्या जखराला बोलवायचे.. तो येतो आणि तुम्हाला सर्व प्रश्नांची उत्तर देतो... हा हा... कस सुचत बर या लोकांना...विचार करता करता पंकजला काहीतरी सुचले, समजा आपणही असाच काहीतरी थोतांड अनुभव आणि उपाय लिहून या फोरम वर टाकला तर... हा तसंच करूया, बघूया लोकांच्या काय प्रतिक्रिया येतात ते', या वर बराच वेळ विचार करीत पंकज झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी पंकज संध्याकाळी कामावरून लवकर घरी आला. रात्रीचे जेवण आटोपून तो लॅपटॉप घेऊन बसला आणि त्याने ते फोरम सुरु केले. त्याने एक नवीन अकाउंट त्या फोरमवर

तयार केले त्यात त्याने त्याचे नाव मिस्टर पी असे लिहिले होते. काय काय लिहायचे हे त्याने संबंध दिवसात विचार करून ठेवले होते.

त्याने लिहिलेली पोस्ट हि अशी…

नमस्कार मित्र आणि मैत्रिणींनो. मला आज तुमच्यासोबत माझा एक अत्यंत भयानक अनुभव शेअर करायचा आहे. दोन वर्षांपूर्वी मी जेव्हा कोकणात काही कामानिमित्त गेलो होतो तेव्हा तेथे एका सरकारी कॉटेजमध्ये राहिलो, त्याच जागेत मला काही अनैसर्गिक अनुभव आले, त्याठिकाणी काहीतरी वावरत होते, रात्री बारानंतर मला कसलातरी आवाज यायचा, कोणीतरी शीळ घालत असल्याचा आवाज होता तो. पण मी त्याकडे दुर्लक्ष केले, दोन दिवस तेथे राहिल्यानंतर तिसऱ्या दिवशी मला ते दिसले. तो एक बाहुला होता साधारण फूटभर उंचीचा होता तो. त्याचे शरीर काहीसे पारदर्शी होते त्याला पाहून मी दचकलो अंग थरथरू लागले. तो हळू हळू शीळ घालीत पुढे सरकला आणि माझ्यासमोर येत म्हणाला, 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'.

मी घाबरलो आणि किंचाळत तेथून बाहेर पडलो. ती संबंध रात्र मी कॉटेजच्या बाहेर बसून काढली. दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्य उगवताच मी माझ्या खोलीत दबक्या पावलांनी गेलो, माझे सामान उचलले आणि तेथून निघालो ते थेट माझ्या घरी आलो. मला वाटले कि मी त्या संकटातून बाहेर पडलो, पण नाही तो बाहुला मला पुन्हा दिसला तो दररोज रात्री माझ्या आजूबाजूला असायचा आणि मला म्हणायचा 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'. तो येण्याची खून म्हणजे त्याची ती शीळ, ती हृदय गोठवणारी शीळ.

मी याबद्दल सर्व माझ्या बायकोला सांगितले आणि आम्ही तडक कोकणात जाण्याचा निर्णय घेतला. माझ्या बायकोचे दूरचे कोणी नातेवाईक कोकणात राहत होते आणि त्यांना ह्या सर्व गोष्टींचा अनुभव होता म्हणे, तंत्र मंत्र विद्या त्यांना अवगत होत्या. तेथे गेल्यानंतर आम्ही त्यांना भेटलो आणि सर्वकाही तपशीलवार सांगितले. त्यांनीही शांतपणे सर्व घटना ऐकून घेतली आणि शेवटी ते म्हणाले तुमच्या मागे अंजक लागला आहे. तो एकप्रकारे तुमचं भलेही करील अथवा तुम्हाला पुरता धुळीत मिळविल. तुम्ही ज्याठिकाणी राहिला होता त्या ठिकाणी त्याला जागृत केले गेले होते आणि काही कारणास्तव तो तेथे अडकून पडला असावा. आम्ही त्यांना विचारले कि आता यातून सुटका कशी होईल. ते म्हणाले यातून सुटका तेव्हाच होईल जेव्हा तुम्ही त्याला तीन प्रश्न विचाराल. पण प्रश्न अगदी विचार करून विचारा… वेडावाकडा प्रश्न विचाराल तर तो चिडेल आणि तुमच्या मानगुटीवर बसेल मग तुमची सुटका तेव्हाच होईल जेव्हा ज्याने याला जागृत केले त्याचे रक्त याच्या तोंडाला लागेल.

बापरे किती भयानक गोष्टी असतात एक एक… (लिहिता लिहिता पंकज खुदुखुदू हसत होता)

त्यानंतर आम्ही त्याला विचारण्यासाठी तीन प्रश्न तयार केले. ते माझ्याबद्दलचे अगदी साधे प्रश्न होते. त्या रात्री तो आला होता त्याची ती विशिष्ट शीळ घालीत. माझ्या जवळ येऊन तो म्हणाला 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'. तेव्हा मी न घाबरता त्याला एक एक करीत तीन प्रश्न विचारले, त्याने प्रश्नांची उत्तरं दिलीत आणि तो तेथून नाहीसा झाला. तो पुन्हा मला कधीच दिसला नाही. मित्रांनो तुम्हाला माहित आहे मी त्याला शेवटचा प्रश्न विचारला होता कि 'पाच लाख रुपये जिंकवून देणाऱ्या लॉटरीचा नंबर काय?'. तुम्हाला विश्वास बसणार नाही

त्याने मला जो नंबर सांगितला त्याने माझे आयुष्य पालटले. त्यानंतर आम्ही माझ्या बायकोच्या त्या काकांना पुन्हा भेटलो आणि सर्व हकीकत सांगितली. मी त्यांना विचारले कि त्या अंजकाला पुन्हा बोलवायचे असल्यास काय विधी आहेत, तेव्हा ते गडगडाटी हसले आणि म्हणाले, 'येड्या गबाळ्याचं काम नाही ते बाळा, सही सलामत सुटलास तू त्यात धन्यता मान'. पण मीसुद्धा इरेला पेटलो होतो. मी त्यांना एक लाख रुपयांची लालूच दाखविली त्यांनी ती मान्य केली नाही पण माझा हट्ट पाहून त्यांनी मला विधी सांगितली.

अमावास्येच्या अथवा पुढील पाच दिवसात मध्यरात्री ठीक बारा वाजता हि विधी करता येऊ शकते.
एक साधी कापडाची बाहुली घ्यायची. हात, पाय, डोळे, नाक तोंड सगळं अगदी व्यवस्थित असलेली बाहुली. तुम्ही स्वतः बनविली असली तर अगदी उत्तम. त्या बाहुलीच्या गळ्यात तुमच्या कापलेल्या नखांची दोऱ्याने बांधलेली माळ घालायची. मग उजव्या हाताच्या अंगठ्याचे रक्त त्या बाहुलीच्या कपाळाला लावायचे.
एक मिठाचे वर्तुळ तयार करायचे आणि ती बाहुली त्या रिंगणात ठेवायची. त्यांनंतर बाहुलीच्या छातीवर हात ठेवून त्याला बोलवायला सुरुवात करायची. थोड्या थोड्या वेळाने तीन वेळा त्याला हाक मारावी. जर तुम्ही सर्व काही नीट केले तर तिसऱ्या हाकेनंतर तुमच्या हाताखाली असलेल्या बाहुलीत हालचाल जाणवेल आणि काही वेळातच एक शीळ तुमच्या कानी पडेल. म्हणजेच अंजक तुमच्या पर्यंत पोहोचला असेल. लक्षात ठेवा अंजकला विचारायच्या तीन प्रश्नांची यादी आधीच तयार करून ठेवा. तीनही प्रश्न विचारून होइपर्यंत बाहुली मिठाच्या रिंगणातच राहिली पाहिजे.
समजा काही कारणास्तव विधी नीट झाला नाही तर यातील काहीच घडणार नाही आणि बाहुली निरुपद्रवी ठरेल तेव्हा ती बाहुली फेकून दिली तरी चालेल.
समजा अंजक जागृत झाला आणि तुम्ही त्याला प्रश्न विचारले नाहीत तर तो दररोज रात्री बारानंतर तुम्हाला दिसेल आणि म्हणेल, 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'.
समजा तुम्ही त्याला तीन प्रश्न विचारले तरीही तो पुन्हा तुम्हाला दिसला तर मात्र तुम्ही मोठ्या संकटात सापडला आहात अशा वेळेला न घाबरता खाली दिलेला हा मंत्र तीन वेळा म्हणा...

'अपरिम अंजक दवनीश विभुते... नभग्न पारधीव उलटत्वे स्वामीने'

असे केल्याने अंजन त्याच्या मालकाकडे परत जाईल आणि तुमची सुटका होईल.

एवढे लिहून झाल्यावर पंकजने त्याची पोस्ट फोरम वर प्रकाशित केली. रात्रीचे बारा वाजून गेले होते. हसत हसत पंकज झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी पंकजने रात्री जेवण वगैरे आटोपल्यावर फोरम वरील त्याची पोस्ट चेक केली. त्याच्या पोस्टवर दोन टिपण्या आल्या होत्या.

त्यातील एकाने लिहिणे होते 'बापरे खूपच भयानक अनुभव आहे, पण मला एक सांगा ज्या विधीसाठी तुम्ही एक लाख रुपये मोजायला तयार झाला, ते तुम्ही या फोरमवर मोफत का शेअर केले?'. त्यावर पंकजने लिहिले 'मला पहायचे आहे असाच अनुभव घेण्याचं धाडस कोणा कोणाकडे आहे'.

दुसऱ्या एकाने लिहिले होते की, 'काय वात्रट आणि भंकस गोष्ट आहे ही'. ती टिपणी वाचून

पंकज अगदी मनापासून हसला त्याला लिहावेसे वाटले की तू अगदी बरोबर बोललास मित्रा पण त्याने तसे नाही लिहिले.

आणखी काही दिवस निघून गेले, पंकज रोज फोरम वरील येणाऱ्या टिपण्या वाचत होता. दिवसेंदिवस त्याची ती पोस्ट लोकप्रिय होऊ लागली, अनेक लोकांनी त्याच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिल्या. बहुतेक जणांना पंकजचा अनुभर अगदी खरा वाटला, पंकजला या गोष्टीची खूप गम्मत वाटली.

त्या दिवशी अमावस्या होती. रात्रीचे अकरा वाजले होते. पंकज नेहमी प्रमाणे सर्व आवरून लॅपटॉप घेऊन बसला होता. त्याने फोरमची लिंक उघडून त्याची ती पोस्ट ओपन केली. आज त्याच्या पोस्टवरील एका नवीन कमेंटने त्याचे लक्ष वेधले.

ती कमेंट एका मुलीने लिहिली होती ती अशी, 'मी आज ही विधी करणार आहे, मागील दोन तीन दिवस मी याची तयारी करत होती, बाहुली आणि इतर सर्व सामान तयार आहे, उद्या काय काय घडले ते सविस्तर सांगेन'. ती कमेंट बघून पंकज खूप हसला. रात्रीचे बारा वाजत आले होते. पंकजने त्याचा लॅपटॉप बंद केला आणि तो झोपायला गेला. बराच वेळ त्याला झोप लागली नाही, त्याच्या डोक्यात सारखे काहीबाही विचार येत होते. त्या मुलीने खरच ती विधी केली असेल का, न राहवून एक अनामिक भीतीयुक्त शिरशिरी त्याच्या अंगभर फिरली. काही वेळाने पंकज झोपेच्या अधीन झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्या उठल्या त्याने पोस्ट चेक केली पण त्या मुलीची प्रतिक्रिया अजून आली नव्हती. एकूणच पंकज तिची प्रतिक्रिया वाचण्यासाठी अधीर झाला होता. त्या दिवशी पंकजला ऑफिसमध्ये खूप काम होते, काम करता करता कधी रात्रीचे अकरा वाजून गेले कळले नाही. पंकज रात्री उशिरा घरी आला, तो खूप थकला होता. जेवण त्याने बाहेरच केले होते. घरी आल्या आल्या त्याने अंथरुणात स्वतःला झोकून दिले आणि तो झोपी गेला.

अंधारी रात्र होती, बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते. त्याच्या आवाजाने पंकजची झोप चाळवली, कुत्र्याचे भुंकणे थांबले तसा खोलीत एक विचित्र हलक्या स्वरूपाचा आवाज आला, कोणीतरी शीळ घालीत होते. अर्धवट झोपेत पंकजने डोळे किलकिले करून बघितले. खिडकीतून अंधुकसा प्रकाश घरात पसरला होता आणि त्या प्रकाशात त्याला काहीतरी दिसले. साधारण फूटभर उंच. तांबड्या पोत्याने शिवलेल्या अंगाची ती एक बाहुली होती. ती बाहुली बघून पंकजच्या काळजात चर्रर्र झाले. झोप कुठच्या कुठे उडाली. पंकज अंथरुणात उठून बसला. त्याच्या मानेवरचा केस ताठ झाले होते.

समोरील त्या बाहुलीने आता हालचाल सुरु केली होती. ती सावकाश पंकजच्या दिशेने चालत होती. रात्रीच्या त्या निरव शांततेत त्या बाहुलीच्या इवल्याशा पावलांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. पंकज थरथरत्या अंगाने त्या बाहुलीकडे बघत राहिला. त्याला कळत नव्हते कि हे खरंच घडत आहे कि स्वप्न आहे. ती बाहुली पंकजच्या जवळ येऊन उभी राहिली आणि म्हणाली, 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'. पंकज अडखळत मोठ्याने किंचाळला आणि मूर्च्छा येऊन खाली आडवा झाला.

दुसऱ्या दिवशी पंकज उठला ते जड आणि ताप भरलेल्या अंगाने. त्या दिवशी त्याने कामावर सुट्टी घेतली. डॉक्टरकडे जाऊन आला आणि दिवसभर आराम केला. त्याला वाटले कि रात्री

त्याने एक वाईट स्वप्न बघितले होते.

कितीही झाले तरी वाईट गोष्टी या जळमटा सारख्या सहज अंगाला चिकटतात. पंकजच्या बाबतीतही असेच काहीसे घडत होते.

तो संबंध दिवस आराम केल्या नंतर संध्याकाळी त्याला थोडे बरे वाटू लागले. रात्रीचे जेवण आटोपल्यावर त्याने लॅपटॉप उघडला आणि त्या फोरम वरील त्याची पोस्ट चेक केली. त्या मुलीची प्रतिक्रिया आली होती. तिने लिहिले होते, 'तुम्ही सांगितल्या प्रमाणे सर्व विधी मी रात्री बारा वाजता केल्या, काही वेळ मला काहीच जाणवले नाही म्हणून मी बाहुलीवरील हात काढून घेतला, रिंगण पुसून घेतले, सामानाची आवरा आवर केली. काहीवेळ सामान आवरताना माझे लक्ष बाहुलीकडे नव्हते, बाहुली फेकून देण्यासाठी मी बाहुलीकडे वळले आणि बघते तर काय बाहुली तिच्या जागेवर नव्हती... ते पाहून मी घाबरले पण तुम्ही सांगितलेला मंत्र आठवला तो तीन वेळा म्हटला... अजून तरी वाईट असं काही घडलं नाही... धन्यवाद' तिची प्रतिक्रिया वाचताना पंकजच्या हृदयाची धडधड वाढत होती.

त्याच्या त्या पोस्टवर आणखी बऱ्याच जणांच्या नवीन कमेंट आल्या होत्या. त्यात त्यांनी विधी करणार असल्याचे अथवा करून झाल्यानंतरचे अनुभव लिहिले होते.

एकाने तर लिहिले होते कि, 'तुमचे खूप खूप आभार, मी सर्व विधी सांगितल्या प्रमाणे केल्या... अंजक जागृत झाला, मी त्याला तीन प्रश्न विचारले...'

एकाने लिहिले होते, 'माफ करा पण माझ्या हातून काही तरी चूक झाली असावी, विधी करीत असताना मी त्याला दोन वेळा हाक मारल्यावर लगेच माझ्या हाताला बाहुलीची हालचाल जाणवली त्यामुळे मी तिसरी हाक न मारता हात बाजूला केला आणि बघतो तर काय ती बाहुली तेथून नाहीशी झाली होती... मिस्टर पी प्लिज मला सांगा पुढे काय करू'.

आणखी काहीही न वाचता पंकजने लॅपटॉप बंद केला आणि तो डोक्याला हात लावून बसून राहिला. काय करावे काही सुचत नव्हते. आपण वाचतोय ते खरेच आहे कि नुसत्या भंकस गोष्टी आहेत हे त्याला कळत नव्हते. त्याच्या मनाने अचानक कलाटणी खाल्ली होती.

घड्याळाची टिकटिक दौडत होती. मध्यरात्र जवळ आली होती. रात्रीचे बारा वाजून गेले होते. पंकज गुढग्यात तोंड खुपसून एका कोपऱ्यात बसला होता. आणि अचानक त्याला ती शीळ ऐकू आली, एकदा, दोनदा किंवा तीनदा. पंकजने मान वर केली आणि त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला, त्याच्या समोर एक नाही दोन नाही तर अनेक छोट्या मोठ्या बाहुल्या उभ्या होत्या. खसखसत त्या पुढे सरकल्या आणि पंकजच्या दिशेने चालू लागल्या. त्या सर्व बाहुल्या पंकजच्या भोवतीने जमा झाल्या आणि म्हणाल्या, 'विचार तुला काय विचारायचे आहे ते'. कितीतरी वेळ तो बारीक किनरा आवाज खोलीत घुमत राहिला. पंकज बसल्या जागीच आडवा झाला. त्याला भोवळ आली, शुद्ध हरपता हरपता त्याच्या मानेला एक मऊ स्पर्श झाला आणि पंकज गतप्राण झाला.

पंकजने त्याच्या पोस्टमध्ये हे लिहिले होते कि त्या बाहुलीकडून सुटका मिळवण्यासाठी तीन वेळा मंत्र बोला जेणेकरून ती बाहुली त्याच्या जनका कडे जाईल पण तिचा जनक यातून कसा सुटका करू शकतो याबद्दल त्याने काहीच लिहिले नव्हते किंवा विचारही केला नव्हता.

कामिनी

किसन मेंढरं घेऊन घरी परतत होता. संध्याकाळचे साडे सहा वाजून गेले होते. सूर्याची केशरी किरणं आता विरळ पडली होती आणि अंधार दाटू लागला होता. माळावरचा तो छोटा डोंगर भरभर उतरत किसन पायथ्याशी आला. बाजूलाच स्मशान होते, चारी बाजूना बांबू रोवून तयार केलेली ती छोटी स्मशानभूमी होती.

काल जाळलेल्या त्या चितेचे काही अवशेष अजूनही तेथे दिसत होते. जळलेल्या लाकडांची काळी राख पसरली होती.

त्या जागेला वळसा मारत किसन पुढे गेला आणि मागून एक सळसळ त्याच्या कानी पडली.

किसन दचकला, त्याने मागे वळून पाहिले. मागे कोणीही नव्हते. वाऱ्याचा एक झोत आला आणि स्मशानातील काळी राख हवेत उडाली. त्या राखेतून एक आकृती तयार झाल्याचा भास किसनला झाला. भयचकित नजरेने तो समोर पाहत राहिला. हवेतसोबत उडणारी काळी राख हळूहळू परत जमिनीवर स्थिरावत होती. भानावर येऊन किसन झटकन मागे फिरला आणि मेंढरांना हाकत भरभर पुढे चालू लागला. एव्हाना सूर्य डोंगराआड झाला होता. गावातील वस्ती अजून एका मैलावर होती. गडद अंधार दाटू लागला होता.

किसन तसा धीट मनाचा तरुण होता, पण राहून राहून त्याच्या मनात एक अनामिक भीती दाटत होती. कारण कालच गावातील अंबादासचे निधन झाले होते. अंबादासचे सहा महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. लग्न झाल्यापासून त्याचे त्याच्या बायकोसोबत खटके उडत होते, त्याचा तिच्या चारित्र्यावर संशय होता. अंबादास मरायच्या आदल्या दिवशी त्याची बायको कामिनी अचानक नाहीशी झाली होती, आणि घरात एक पत्र सापडले होते. त्या पत्रात ती तिच्या प्रियकरासोबत पळून जात असल्याचा उल्लेख केला होता. या गोष्टीमुळे आंबदासला प्रचंड मनस्ताप झाला.

दुसऱ्याच रात्री आंबदासला अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या, इस्पितळात नेण्यापूर्वीच अंबादास मेला होता.

किसन भरभर चालत निघाला होता. मेंढरं पुढे हाकीत तो मागे न बघता पुढे चालत होता कारण त्याला कळले होते की काहीतरी त्याच्या मागावर आहे. कोणीतरी त्याचा पाठलाग करीत आहे. मध्येच दूरवरून एखादी कोल्हेकुई ऐकू आली आणि किसनच्या अंगातून भीतीची लहर सळसळत गेली. किसनने अर्धा मैल अंतर कापले होते. दूरवरून गावातील घरांची ओळ दिसत होती, पिवळे पांढरे चमकणारे दिवे दिसत होते.

रस्त्यावर एकही दुसरा माणूस दिसत नव्हता, किसनने मान वर करून वर पाहिले, अवकाशात

मिट्ट काळोख पसरला होता. मागून जे काही सरकत येत होते त्याची गती वाढली होती, आणि क्षणातच त्याने मागून येत किसनवर झेप घेतली. किसनला ओरडायचाही वेळ मिळाला नाही.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. आंबदासच्या घरात सर्वजण शांत झोपेत होते. अचानक दारावर टकटक झाली. एकदा दोनदा तीनदा पण कोणीही दरवाजा उघडला नाही. त्यानंतर मात्र दारावर जोरात थापा पडू लागल्या. आंबदासचा भाऊ हरिदास दचकून जागा झाला. तो जागचा उठला, इतक्यात त्याची बायको आणि आई सुद्धा उठली होती.

हरिदास दरवाजा जवळ आला, दारावर थापा पडतच होत्या. हरिदासने कडी काढली आणि दार आत ओढून दरवाजा उघडला. बाहेर किसन उभा होता.

"काय रे किसन्या एवढ्या रातीच कशापायी आलास", हरिदासने वैतागून विचारले.

"अरे हऱ्या झोपलास काय निवांत, तिकडं अंबादासची बायको घावली हाय", किसन म्हणाला.

हे ऐकून हरिदासची कानशिल गरम झाली, खेकसत हरिदास म्हणाला, "काय खूळ बीळ लागलय का तुला किसन्या, आता वाजल्यात किती, आणि आली असेल तर मरुदे तिकडं, तिझ्या मूळ माझा भाऊ मेला".

"आर मग तुझं रक्त सळसळत न्हाय का, धरून बडव की तिला, आयती आलिया, पाड मुडदा तिचा", किसनने डोळे विस्फारले होते त्याच्या कोरड्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसत होती.

"आर तुला काय पडलंय तीच, तू जा तुझ्या घरला आन अमास्नीबी झोपूदे जा", हरिदास चाचरत म्हणाला.

"तिला माहीत हाय, अंबादास कसा मेला ते", सहा फुटी किसन पुढे वाकत डोळे मोठे करीत म्हणाला.

त्याचा तो अविर्भाव पाहून हरिदासने एक आवंढा गिळला, काय बोलावे काही सुचले नाही आणि तो दारातून बाहेर आला, आतून त्याची आई आणि बायको ते संभाषण ऐकत होते पण दोघीही गपचूप आत बसून होत्या.

हरिदासने त्याच्या मागे दरवाजा लावून घेतला.

"चल माझ्या बरुबर पटपट", हरिदासचा हात ओढत किसन म्हणाला.

दिडमुठ होऊन हरिदास किसन सोबत चालत निघाला. दोघेही भरभर चालत गावाच्या वेशिजवळ आले, घरांची रांग मागे पडली, समोर ते छोटे स्मशान दिसत होते. हिरदासच्या हृदयाची धडधड वाढत होती.

"ए किसन्या इकडं कुठं घेऊन चालास मला तू", हरिदास म्हणाला तसा किसनने त्याचा हात आणखी आवळला.

हरिदासला कळून चुकले की हा काहीतरी विचित्र प्रकार आहे. तो हाताला जोरात झटका देऊ लागला पण किसनने त्याला ओढतच पुढे आणले. किसनच्या मजबूत हातातून त्याची सुटका

होणे अशक्यच.

स्मशाना समोर किसनने हरिदासला ढकलत आडवे पाडले, हरिदास गोंधळला, धडपडत तो उठून उभा राहिला आणि आता प्रथमच त्याने किसनच्या चेहऱ्याकडे नीट पाहिले. किसनचे डोळे लालभडक झाले होते. अंधुक प्रकाशात त्याचा चेहरा भयानक दिसत होता. दात विचकून तो हरिदासकडे पाहत होता. हरिदास ते पाहून भयभीत झाला. हृदय भात्यासारखे उडू लागले. हातपाय लटपटू लागले. हरिदासला कळून चुकले की हा आपला अंत आहे.

पुढच्याच क्षणी किसनने हरिदासवर झडप घेतली आणि एक भयंकर किंकाळी आसमंतात पसरली.

हरिदासच्या घरी त्याची आई आणि बायको हरिदासची वाट पाहत बसल्या होत्या. रात्रीचा एक वाजून गेला होता.

दारावर टकटक झाली तशी हरिदासची बायको धावतच गेली आणि दरवाजा उघडला, तिच्या मागोमाग हरिदासची आईसुद्धा आली. दारात किसन उभा होता.

"किसन्या माझा मालक कुठाय", हरिदासच्या बायकोने विचारले.

घोगऱ्या आवाजात हसत किसन म्हणाला, "म्हसनात". असे म्हणत तो आणखी जोरात हसू लागला.

त्याचा तो राकट विचित्र काळवंडलेला चेहरा पाहून हरिदासची बायको आणि आई भयभीत झाल्या, दोघींनी दरवाजा बंद करायचा प्रयत्न केला पण दारावर जोराची लाथ मारत किसन आत आला. किसनच्या हातात आता एक कुऱ्हाड होती.

दोघीही अडखळत खाली पडल्या. दोघींनी आरडाओरडा करायचा प्रयत्न केला तशी किसनने कुऱ्हाड उगारली आणि दोघींना गप्प बसवले.

"की... की... किसन्या आम्ही तुझं काय वाकड केलंय, का आमच्या जीवावर उठालायस", हरिदासची आई म्हणाली.

"मी किसन नाही", किसनच्या तोंडून एक वेगळाच पण ओळखीचा आवाज त्यांच्या कानी पडला आणि दोघींची बोबडीच वळली.

"मी... कामिनी आहे... आई", किसनच्या तोंडून पुन्हा तो आवज आला.

पुढे दोघी काही बोलणार इतक्यात, किसनने एका झटक्यात पुढे येत कुऱ्हाडीचा घाव हरिदासच्या बायकोच्या डोक्यात घातला. आघात इतका जलद आणि प्रचंड होता की तिला ओरडायचाही वेळ मिळाला नाही.

डोक्यात घुसलेली कुऱ्हाड तशीच घेवून ती आडवी पडली. बाजूला बसलेली हरिदासची आई डोळे विस्फारून फक्त तिच्याकडे पाहत राहिली. घशातील आवाज आता कुरकुर करण्या इतपत राहिला होता. संबंध शरीर लुळे पडले होते.

"अंबादास कुठे आहे... आई", किसनच्या तोंडून कामिनी म्हणाली.

एक आवंढा गिळत तिने मान किसनकडे वळवली. किसनचे डोळे लालभडक झाले होते.

"का... कामिनी मला माफ कर", हात जोडत ती म्हणाली.

"अंबादास कुठे हाय... आई", मोठ्या घोगऱ्या आवाजात कामिनी म्हणाली.

"मला माहित न्हाय, मला माहित न्हाय, माझ्या पोराला माफ कर, त्याला मारू नगस", आई हात जोडत म्हणाली.

भयंकर चिडत किसनने डोक्यात रुतलेली कुऱ्हाड खसकन ओढून बाहेर काढली तशा रक्ताच्या चीळकांड्या घरभर उडाल्या.

"माळावर, गणपतच्या घरात हाय अंबादास", आई प्राणांतिक भयाने म्हणाली.

"माझ्या मरणाच्या शेवटच्या येळेला मला वाचवायचा तू एक प्रयत्न केलास, म्हणून तुला जित्ती सोडत हाय", असे म्हणत किसन तेथून उठला आणि घराबाहेर पडला.

कालच्या दिवशी असे काही घडले होते...

अंबादास आणि कामिनी दोघांमध्ये वाद भडकला होता. अंबादास शिव्यांची लाखोली वाहत कामिनीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवीत होता. तिच्या आई वडिलांना दूषणे लावीत होता. कामिनीला हे सर्व असह्य झाले आणि तिचा भडका उडाला. रागाच्या भरात ती काहीबाही बोलून गेली आणि आंबदासच्या डोक्यात सैतान उतरला. त्याने कामिनीला मारहाण करायला सुरुवात केली.

घरात त्याचा भाऊ हरिदास, वहिनी आणि आई होते. पण तिघांचा आंबदासला पाठिंबा होता.

ही भांडण तेव्हापासून सुरू झाली जेव्हा आंबदासने कामिनीच्या वडिलांकडून पैशांची मागणी केली. लग्नात आंबदासला बऱ्यापैकी हुंडा मिळाला होता. पण महिन्याभरातच अंबादासने सर्व पैसा जुगार आणि दारूत उडवला होता. त्यानंतर तो कामिनीकडे सतत पैशांची मागणी करीत होता पण कामिनी त्याला दाद देत नव्हती. अंबादासचा भाऊ, वहिनी आणि आईसुद्धा त्याला सामील होते, त्यामुळे कामिनीचा घरात छळवाद सुरू झाला होता.

पण काल कामिनीला हे सर्व असह्य झाले आणि तिने प्रतिकार केला पण त्याचा परिणाम उलट झाला. त्वेषाने अंबादासने कामिनीचा गळा आवळला. कामिनी त्याच्या हातात तडफडत होती. बाजूला त्याचा भाऊ हरिदास आणि वहिनी हा तमाशा आवडीने बघत उभे होते.

कामिनीचे अंग हळूहळू सुन्न पडू लागले होते, डोळ्यासमोर अंधार होऊ लागला होता, अंबादासच्या आईने पुढे येत अंबादासला अडवण्याचा प्रयत्न केला पण तो असफल ठरला होता. कामिनीने प्राण सोडला होता.

प्रश्न होता की आता कामिनीच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची.

"मी सांगतो तस कर अंबादास", हरिदास म्हणाला.

"कामिनी तिच्या प्रियकरासोबत पळून जात आहे अशी चिट्टी लिव, बायको पळून गेली असा

बोभाटा गावभर होईल, संध्याकाळी तु अचानक आजारी पडशील, तुला रक्ताच्या उलट्या होतील तुला घेऊन मी आणि गणपत तालुक्याला घेऊन जाईन आणि वाटतच तुझं बरेवाईट होईल, येताना वेसी जवळच्या समशानात तुला अग्नी दिला जाईल, येतंय का लक्षात", हरिदास म्हणाला.

"आर मी मरणार म्हंजी गाव सोडावं लागणार मला", अंबादास म्हणाला.

"हे बघ अंबदासा हिचा खून करून लै मोठं लाचांड केलायस, आता ह्या झोंबड्यातून सहीसलामत सुटायचं असलं तर गाव सोडावं लागल, मागपुढं बघू काय करायचं ते", हरिदास म्हणाला.

अंबादासने काही विचार केला आणि त्याच्या चेहऱ्यावर एक क्रूर हास्य पसरले. ठरल्या प्रमाणे सर्व घटना घडत गेल्या. गावभर बातमी पसरली की अंबादासची बायको पळून गेली आणि अंबादास तिच्या जाण्याने आजारी पडला. रात्री आंबदासला घेऊन हरिदास आणि त्याचा मित्र तालुक्याला निघाले. बैलगाडीत कामीनीचा मृतदेह अगदी शिताफीने लपवून ठेवला होता. गावाच्या वेशिवरून हरिदासचा मित्र गावात अंबादास वारल्याची बातमी घेऊन आला.

गावातील काही माणसांच्या समक्ष त्या छोट्या स्मशान भूमीत मृतदेहाला अग्नी दिला गेला, चिता जळली होती पण ती कामिनीची. अंबादास मळ्यातल्या घरात लपून बसला होता.

रात्रीचे दोन वाजून गेले होते. माळावरच्या त्या घरात अंबादास आणि गणपत झोपले होते. रात किड्यांचं किर्र गायन सुरू होत. घरात एक जुनाट पिवळा दिवा पेटला होता.

अंबादासने त्याची कूस बदलली. दिव्याच्या प्रकाशाने त्याची झोप चाळवली. डोळे किलकिले करीत त्याने उघडले आणि बघतो तर काय समोर किसन बसला होता. त्याला पाहून अंबादास दचकला. आंबदासाची नजर बाजूला ठेवलेल्या रक्ताने भरलेल्या कुऱ्हाडीवर पडली, आणि त्याचे काळीज लककन हलले. तो जागचा उठून बसला. आवाजाने गणपतचीही झोप चाळवली आणि तो डोळे चोळत उठला.

"ए किसन्या इथं काय करतुयास ह्या येळेला", अंबादास चाचरत म्हणाला.

पण किसन एकटक त्याच्याकडे पाहत बसला होता. अंबादास जागचा उठू लागला तशी किसनने बाजूला ठेवलेली कुऱ्हाड हातात घेतली ते पाहून अंबादास परत जागीच बसला.

गणपत किसनला शिव्या देत जागचा उठला.

"काय रे ए किसन्या, मेंढरं कुराडीन मारून आलास की काय, आन हित कशापायी आलास", गणपत पुढे येत म्हणाला पण किसन एकटक अंबादासकडे पाहत होता.

"अरे ए, उठ हितन", गणपत तिरिमिरीत पुढे आला आणि किसनचे बखोट धरले तसा किसन जागचा उठला. त्याच्या डोळ्यात अंगार फुलत होता.

गणपतने किसनला एक धक्का देत मागे ढकलले आणि दुसऱ्याच क्षणी हातातील रक्ताने माखलेली कुऱ्हाड विद्युत वेगाने गणपतच्या छाताडावर बसली. गणपत खाली कोसळत असताना किसनने कुऱ्हाड खसकन मागे खेचली. रक्ताच्या चिळकांड्या घरभर उडाल्या.

हे अंबादासला पूर्णपणे अनपेक्षित होत, पुतळ्या प्रमाणे अंबादास हे दृश्य पाहतच बसला होता.

"मला वळखल न्हाय मालक", किसनच्या तोंडून कामिनीचा आवाज आला आणि अंबादास डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहू लागला.

"मी असा काय गुन्हा केला होता की मला तुम्ही ठार मारलं", किसन.

"का... कामिनी, मला मला माफ कर कामिनी... मला माफ कर", अंबादास हात जोडत रडत म्हणाला.

"मी तुम्हाला घेऊन जायला आली हाय मालक, तुमच्या बिगर मला एकदिसबी करमत न्हाय", किसन पुढे आला, हातातल्या कुऱ्हाडीची पकड मजबूत केली.

अंबादास पुढे काही बोलणार इतक्यात त्याच्या मानेवर जोराचा घाव बसला आणि शीर धडावेगळे झाले.

हडळ

कोल्हापुरातील एक छोटे गाव खामरगाव. दरवर्षी जानेवारी महिन्यात या गावचा उरूस भरत असे. गावातील लोक आवर्जून आप्तेष्टांना उरुसाच्या जेवणाचे निमंत्रण देत आणि निमंत्रणाला मान देऊन लोक गावात जेवणाला येत.

उरुसाच्या दुसऱ्या दिवशी गावातील लोक देवीच्या दर्शनासाठी आणि आशीर्वादासाठी मंदिरात गर्दी करीत असत. देवीचे मंदिर लोकवस्ती पासून साधारण दोन किलोमीटर अंतरावर होते. जाताना साधारण दीड किलोमीटर कच्चा रस्ता होता तेथून पुढे मात्र वाटेत शेत लागत असे आणि शेतातल्या पायवाटेवरून पुढे जावे लागे. या वाटेवर जिथे कच्चा रस्ता संपे तिथे एक जुने पडके घर होते, त्या भल्या मोठ्या परिसरात ते एकच घर तिथे होते, फार पूर्वीपासून लोक त्या जागेला घाबरुन होते, कारण ते हडळीचे घर होते. बऱ्याच लोकांना तेथे विचित्र अनुभव आले होते, कधी कोणाला पांढरी साडी नेसलेली बाई दिसली होती, कधी कोणाला हिरव्या साडीतील बाई, कधी चित्रविचित्र ओरडण्याचे आवाज येत, कधी हसण्याचे आवाज येत. लोक सहसा या जागेवर दिवसाच जात असत.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. गावात रंजित नावाचा तरुण राहत होता. रंजितचे दोन महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. उरुसाच्या दिवशी घर नातेवाईकांनी भरून गेले होते, जेवणखाण झालं आणि सर्वजण आपापल्या घरी गेले. दुसऱ्या दिवशी देवीच्या दर्शनाला जायचे ठरले, पण त्या दिवशी रंजितला कामावरून यायला बराच वेळ लागला, त्यामुळे दर्शनाला जाण्यासाठी बराच उशीर झाला होता. रात्रीचे आठ वाजले होते. तरीही दर्शनाला जायचेच म्हणून रंजित आणि त्याची बायको रंजना तयार झाले आणि घराबाहेर पडले.

दोघेही मोटारसायकल वरून निघाले. जाताना परतणाऱ्या लोकांची गर्दी दिसत होती, हळूहळू ती गर्दी विरळ झाली. रंजित आणि त्याची बायको कच्चा रस्त्याच्या शेवटापर्यंत पोहोचले. रंजितने मोटारसायकल बंद केली आणि एका बाजूला उभी केली. सर्वत्र सामसूम झाले होते. रंजितने आजूबाजूला नजर फिरवली, परिसरात एकही माणूस दिसत नव्हता. त्याची नजर पडली काही अंतरावर असलेल्या त्या पडक्या घरावर आणि काहिक्षण तो अस्वस्थ झाला.

"आपण येऊन चुकी तर केली न्हाय न्हवं", रंजित म्हणाला.

"अहो देवीच्या दर्शनाला आलोय आपण, अस काय म्हणता", रंजना म्हणाली.

"तस न्हाय पर", पुढे काही न बोलता रंजित गप्प झाला कारण या जागेबाबत रंजनाला काहिच माहीत नव्हते.

"बर ठीक हाय चल पुढं", रंजित म्हणाला.

दोघेही शेतातील पायवाटेत शिरले. आजूबाजूला सर्वत्र काळोख पसरला होता. दूरवरून देवीचे ते छोटे मंदिर दिसत होते, मंदिरासमोर एक अंधुक पांढरा दिवा पेटला होता.

चालता चालता पाय ठेचकाळत होते. कसेबसे दोघेही मंदिरापर्यंत आले. दोघांनीही देवीचे दर्शन घेतले आणि माघारी फिरले. भरभर चालत दोघेही कच्या रस्त्या पर्यंत आले.

रातकिड्यांची किर्र किर्र सुरू होती. मधूनच कुत्र्याच्या विव्हळण्याचा आवाज येत होता. रंजितने मोटारसायकलला किक मारली पण मोटारसायकल चालूच झाली नाही. त्याने पुन्हा पुन्हा प्रयत्न केला पण मोटारसायकल चालूच होईना. रंजित आणि त्याची बायको आता अस्वस्थ होऊ लागले होते. भयाण काळोख्या परिसरात, या निर्जन जागी ते दोघेच उरले होते, रस्त्यावर एकही कोणी माणूस दिसत नव्हता. किक मारून मारून रंजित दमला होता.

"आता काय करायचं हो", रंजना म्हणाली.

"आता एकच कराय लागलं, ढकलत न्यावी लागलं दोन किलोमीटर", रंजित म्हणाला.

रंजितने मोटारसायकल ढकलायला सुरुवात केली. रंजना त्याच्या मागून चालत होती, दोघेही भरभर पुढे जात होते, साधारण अर्धा किलोमीटर अंतर कापल्यावर रंजितला काही जाणवले, मागून त्याला रंजनाच्या चालण्याचा बोलण्याचा आवाज येत नव्हता. त्याने झटकन मागे वळून पाहिले, आणि बघतो तर काय, रंजना कुठेच दिसत नव्हती. रंजितच्या काळजात चर्रर्र झाले. त्याने रंजनाला मोठ्याने आवाज दिला पण तिचा काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

रंजितने मोटारसायकल एका बाजूला उभी केली आणि तो मागे वळला. दूरवर त्या मोकळ्या परिसरात कोणीच दिसत नव्हते. रंजित भयभीत झाला. धावत पळत तो इकडेतिकडे रंजनाचा शोध घेऊ लागला पण रंजना कोठेच दिसत नव्हती.

इकडेतिकडे शोधत असताना अचानक एक आवाज रंजित च्या कानी पडला. तो रंजनाचा आवाज होता. रंजना मदतीसाठी ओरडत होती. तो आवाज शेताच्या बाजूने येत होता. रंजित त्या दिशेने धावत सुटला. तेथे पोहचेपर्यंत रंजनाचा आवाज बंद झाला होता आणि पुन्हा भयाण शांतता पसरली होती.

एक दोन क्षण गेले आणि पुन्हा रंजनाचा आवाज आला, या वेळेस तिच्या आवाजात प्रचंड भीती जाणवत होती, तिचा आवाज ऐकून रंजितच्या हृदयात धडकी भरली. तो आवाजाच्या दिशेने सैरावैरा धावत सुटला. थोडे पुढे गेल्यावर रंजित जागीच थबकला कारण समोर ते जुनाट पडके घर होते.

रंजनाचा पुन्हा आवाज आला, "वाचवा मला, रंजित, वाचवा...".

रंजनाचा आवाज त्या पडक्या घरातून येत होता. रंजितने मागचा पुढचा विचार न करता घराच्या दिशेने धाव घेतली.

रंजित त्या घरासमोर उभा होता. आजूबाजूला भयाण शांतता होती. समोरील मोडकळीस आलेला दरवाजा त्याने आत ढकलला, कर कर करीत तो दरवाजा उघडला. आतमध्ये काळोख पसरला होता. रंजितने धडधडत्या छातीने आत पाय ठेवला. समोरील खिडकीतून

अंधुक प्रकाश आत पडला होता.

आतमध्ये उजव्या बाजूला एक दार होते, त्या दारामागून हळूच कोणीतरी वाकून रंजित कडे बघितले.

त्या दारात कोणीतरी वाकून उभे होते. ती एक बाई होती. तिचे लांबसडक केस खालपर्यंत लोंबकळत होते, एक पांढरा डोळा रंजित वर रोखला होता आणि अर्धवट उघडलेल्या काळपट ओठांमधील त्या दातांच्या ओळीत एक सुळा दिसत होता.

रंजितला जाणवले की कोणीतरी आपल्याकडे पाहत आहे, त्याने दाराकडे पाहिले. तेथे आता कोणीही नव्हते.

त्या खोलीच्या आत मधून विव्हळण्याचा आवाज आला.

"रंजित... मला वाचवा"

'हा... हा... तर रंजनाचा आवाज आहे, रंजना", ओरडत रंजित त्या दारातून आत गेला. अंधुक प्रकाशात त्याला तेथे फक्त एक जुना पलंग दिसत होता. तेथे कोणीच नव्हते. त्याने मोठ्याने रंजनाला आवाज दिला पण रंजना तेथे कोठेच नव्हती. रंजितला दरदरून घाम फुटला होता. पोटात भीतीने ढवळून निघाले होते. डोळ्यातून पाण्याची एक धार नकळत खाली ओघळली.

रंजित मागे वळला मधल्या दारातून त्याने बाहेरच्या खोलीत पाय ठेवला आणि अचानक त्याच्या समोर ती आली.

ती थेट त्याच्या समोर उभी होती. पांढरे डोळे, लांब नाक, काळपट ओठांवरून लालभडक जीभ फिरवत होती. तिने तोंडाचा मोठा आ वसला आणि तिचे लांबसडक सुळे बाहेर आले.

रंजित डोळे फाडून तिच्याकडे बघत होता. काय करावे त्याला काहीच सुचले नाही. त्याचे सर्वांग गोठले होते. डोळ्यासमोर त्याला त्याचे मरण दिसत होते. रंजित धडपडत जागीच खाली कोसळला.

खरखरीत आवाजात हसत ती हडळ पुढे आली, तिचे लांबसडक हात पुढे आले होते, लांब काळीकुट्ट नखं रंजित च्या डोळ्यासमोर आली. रंजितचा जीव कंठाशी आला होता.

त्याच्या मस्तकात एक विचित्र कळ आली आणि डोळ्यासमोर अंधार पसरू लागला.

"रंजित रंजित उठा"

खोल आवाजात कोणीतरी रंजितला आवाज देत होते. रंजितने डोळे उघडून पाहिले. समोर रंजना होती. रंजनाला पाहून तो आनंदी झाला आणि तिच्या गळ्यात पडला. काही क्षण दोघेही काही न बोलता तसेच बसून राहिले.

रंजित आणि रंजना त्या पडक्या घरातून बाहेर आले. बाहेर मिट्ट काळोख पसरला होता.

शेतातून दोघेही भरभर चालत निघाले होते. मधेच एखादी कोल्हेकुई ऐकू येत होती. रंजनाने रंजितचा हात घट्ट पकडला होता.

चालत दोघेही कच्या रस्त्यापर्यंत येऊन पोहोचले. रंजितची मोटारसायकल समोर होती. रंजितने खिशातून किल्ली बाहेर काढली आणि तो मोटारसायकल वर बसला, त्याने किक मारली आणि मोटारसायकल सुरू झाली.

"ये रंजना बस पटकन, इथून लवकर जायला हवं", रंजित म्हणाला पण रंजना एकटक रंजितकडे पाहत राहिली होती.

"अग काय झालं, अशी का उभी हाय, बस पटकन"

"रंजित तुम्ही घरला जावा, इथून पुढ मला न्हाय येता येणार", रंजना थंड आवाजात म्हणाली.

"काय वेड्यासारख बोलतेस", रंजित मोटारसायकल वरून खाली उतरला आणि रंजना समोर आला.

रंजनाच्या डोळ्यात त्याला एक वेगळाच कोरडेपणा दिसत होता. रंजितला पोटात अगदी ढवळून निघाले.

रंजनाने हात उचलला आणि बाजूच्या शेतातील एका मोठ्या वडाच्या झाडाच्या दिशेने हात केला. रंजितने त्या दिशेने पाहिले आणि त्याला दिसले. त्या झाडाच्या एका पारंबिला रंजनाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात लटकत होता.

रंजित ते पाहून भयचकित झाला. क्षणभर तो स्वतःला विसरून गेला, हे आपण काय पाहतोय रंजना त्या झाडावर तर मग माझ्यासोबत कोण. त्याने झटक्यात समोर पाहिले पण तेथे आता कोणीच नव्हते.

दोन तासांपूर्वी...

रंजित त्याची मोटारसायकल ढकलत भरभर पुढे चालला होता आणि रंजना त्याच्या मागून चालत होती. पण तिच्या मागून कोणीतरी येत आहे याची तिला काहीच कल्पना नव्हती.

चालता चालता अचानक रंजनाला जाणवले की काहीतरी तिच्या मागे आले आहे, अगदी तिच्या जवळ, तिला चिकटून कोणीतरी तिच्यासोबत चालत आहे. रंजनाच्या अंगातून भीतीची लहर सळसळत गेली. तिने झटकन मागे वळून पाहिले, समोर ती हडळ उभी होती, तिचे ते विचित्र हिडीस रूप पाहून रंजना गर्भगळीत झाली. ओरडण्यासाठी तिने तोंड उघडले पण क्षणात त्या हडळीने तिच्यावर झेप घेत खाली पाडले. रंजना बेशुद्ध झाली होती.

बाजूला असलेल्या शेतात गुडघाभर रोप वाढली होती. तेथून ती तिला खेचत घेऊन गेली. अर्धशुद्ध अवस्थेत रंजनाने पाहिले ती हडळ तिच्या अंगावर बसली होती. तिची लांबसडक धारदार नखं तिने रंजनाच्या गळ्यात खुपसली.

एक बारीक चिरका आवाज रंजनाच्या गळ्यातून निघाला आणि ती निष्प्राण झाली.

बाजूला असलेल्या त्या मोठ्या वडाच्या झाडावर त्या हडळीने रंजनाचा मृतदेह पारंबिला बांधला होता.

रंजनाच्या देहाचे पर्यावसान तर झाले होते पण तिचा सूक्ष्मजीव तिच्या नवऱ्यासाठी अडकून

पडला होता. तिला माहीत होते रंजित तिला शोधण्यासाठी धडपडत असेल.

रंजना त्या पडक्या घरासमोर आली होती, तिला माहीत होते की रंजितला त्या हडळीने फसवून घरात जेरबंद केले होते.

त्या पडक्या घरात रंजित अर्धमेल्या अवस्थेत खाली बसला होता. त्याच्यासमोर ती दुष्ट हडळ त्याला ठार मारायच्या पावित्र्यात उभी होती. ती पुढे होऊन रंजितवर घाव घालणार इतक्यात घराचा दरवाजा उघडला होता आणि रंजना आत आली होती.

तिच्या डोळ्यात अंगार फुलला होता. असहाय आणि बेशुद्धावस्थेत असलेल्या रंजित समोरील ती हडळ रंजनाला पाहून मागे सरकली.

मृत्यू नंतरही आपल्या पतीच्या संरक्षणासाठी धावून आलेली ती एक खरी दैवी शक्ती होती.

त्या शक्ती सोबत संघर्ष करण्या इतपत हडळीची ताकत नव्हती. एक मोठा चित्कार करीत ती हडळ तेथून नाहीशी झाली होती.

झोटिंग

विक्रम मुंबई सारख्या मोठ्या शहरात जन्मलेला आणि वाढलेला मुलगा. शहरी वातावरणात वाढलेल्या विक्रमला गावाकडील फारशी माहिती नव्हती पण मित्रांसोबत चार पाच वेळा तो पिकनिकसाठी कोकण, नगर, पुणे वगैरे आशा ठिकाणी जाऊन आला होता. पण ठरलेल्या साचेबद्ध नियोजनानुसार पिकनिक पार पडल्या होत्या. गाव आणि शहरातील फरक म्हणजे राहते घर आणि पिकनिकची स्थळं एवढेच त्याला माहित होते.

डिग्री कॉलेजचे पहिले वर्ष नुकतेच सुरू झाले होते, पावसाळा सुरू होऊन आठवडा उलटला होता. विक्रम आणि आणखी चार मुलांचा ग्रुप एकत्र कॉलेजला येत जात असत.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पिकनिकला जाण्याचा बेत ठरवण्यात आला. मुंबईपासून जवळच पण अगदी निसर्गरम्य असे अलिबाग ठिकाण निवडले गेले. अलिबागपासून अर्ध्या तासावर असलेल्या समुद्रकिनारी थांबायचे ठरले. सर्वांसाठी ते ठिकाण अगदी नवीन होते.

बघता बघता जून महिना निघून गेला. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ठरल्याप्रमाणे विक्रम आणि त्याचे मित्र अलिबागला जाण्यास निघाले.

सकाळी आठ वाजता ठरवलेली गाडी आली, ड्रायव्हर विक्रमच्या मित्राचा जगदीशचा मावस मामा होता.

मुंबईहून गाडी निघाली, सकाळची कोवळी किरणे पसरली होती, हवेत हवाहवासा गारवा भरला होता, अधूनमधून पावसाच्या सरी बरसून जात होत्या. ऊन सावलीचा खेळ सुरू होता, कधी कडक ऊन पडत होते तर अचानक सावली दाटून येत होती.

गाडीने अर्धे अंतर कापले होते, संथ गतीने ड्रायव्हर मामा निवांत गाडी चालवत होते. शनिवारचा दिवस असल्याने, शहराबाहेर फिरायला जाणाऱ्यांची गर्दी होती, मार्गावर छोट्यामोठ्या गाड्यांचे ट्रॅफिक लागत होते. साडे दहा वाजता गाडीने अलिबागच्या वेशीत प्रवेश केला, तेथून साधारण अर्ध्या तासात सर्वजण त्या समुद्रकिनारी पोहोचले.

तेथे एका गावकऱ्याचे घर होते, घरामागे थोड्या अंतरावर त्याने पर्यटकांसाठी छोटे घर बांधले होते तेथे तीन चार खोल्या होत्या, सर्वजण तेथे उतरले. काही वेळाने सर्वजण सामानसुमान रूमवर ठेऊन बाहेर फिरायला आले.

सर्वांच्या मनात उत्साह भरला होता. त्या घरापासून अगदी शे दीडशे पावलांवर समुद्रकिनारा होता. सर्वजण चालत समुद्र किनारी पोहोचले.

समोर निळाशार अथांग समुद्र पसरला होता. एव्हाना पावसाची रिपरिप सुरू झाली होती. त्यांच्याप्रमाणे इतर काही लोक तेथे पर्यटनाला आले होते. पण फारशी अशी गर्दी नव्हती.

विक्रम आणि त्याचे मित्र पाण्यात उतरले. खळाळत्या समुद्राच्या पाण्यात सर्वजण मनमुराद पोहत होते. ड्रायवर मामा मात्र समुद्रकिनारी एका जागी बसले होते. त्यांनी सर्व मुलांना आधीच बजावून ठेवले होते की समुद्राला पाणी खूप लागले आहे, जास्त आत न जाता किनाऱ्यालगतच खेळा. तसे सर्वांना चांगले पोहता येत होते, पण समुद्रात इवल्याशा माणसाचा काय भरवसा, तरी सर्व मुलं काळजीपूर्वक समुद्राच्या पाण्याचा आनंद घेत होते.

दुपारचे बारा वाजले होते. विक्रम आणि त्याच्या मित्रांचा समुद्रात खेळ सुरू होता. एकमेकांवर पाणी उडवणे, पाण्यात ढकलणे ओढणे चालू होते आणि अचानक एका ठिकाणी विक्रम जागीच थबकला, त्याला जाणवले की कोणीतरी त्याचा पाय घट्ट पकडला आहे. घाबरून विक्रम जोरात ओरडला त्याने हालचाल करायचा प्रयत्न केला आणि त्याचा तोल गेला.

सर्व मूल त्याच्या दिशेने धावली. विक्रम पाण्यात गटांगळ्या खात होता. एव्हाना मामाच्या लक्षात ही गोष्ट आली होती, मामाही त्वरित तिकडे पळत गेला. सर्व मुलांनी विक्रमला त्या जागेतून बाहेर आणले. किनाऱ्यावरील एका मोठ्या झाडाजवळ विक्रमला बसवले.

विक्रम जोरजोरात धापा टाकत होता. काही वेळ दम खाल्ल्या नंतर जगदीशने विचारले, "अरे अचानक काय झालं विक्रम".

"माझा... माझा पाय कोणीतरी घट्ट पकडून ठेवला होता पाण्यात, मला जागचे हलताही येत नव्हते", विक्रम श्वास सावरत म्हणाला.

"अरे गाळात पाय रुतला असेल तुझा", ग्रुपमधला अब्दुल म्हणाला.

"नाही रे अब्दुल, मला खरच जाणवलं कोणीतरी माझा पाय आवळून धरला होता, मी हालायचा प्रयत्न केला आणि तोल जाऊन पाण्यात पडलो", विक्रम घाबरल्या आवाजात सांगत होता.

"ए अरे हे बघा", जगदीश डोळे विस्फारून विक्रमच्या पायाकडे बघत म्हणाला.

विक्रमच्या पायावर कसलेशे लालसर ठसे उमटले होते. ते पाहून सर्वजण काहीवेळ भयभीत झाले.

"पोरांनो घाबरू नका, एखादा मासा बिसा आला असल, किनाऱ्याजवळ", ड्रायव्हर मामा म्हणाले.

दुपारचा एक वाजून गेला होता. सर्वजण खूप दमले होते. सर्वात आधी विक्रमला घेऊन सर्वजण रूमवर आले. तेथे विक्रमच्या पायाला अँटिसेप्टिक मलम लावला. विक्रमला फार काही वेदना होत नव्हत्या आणि लालसर भाग हळूहळू निवळु लागला होता. त्यामुळे सर्वजण निश्चित झाले होते.

दुपारचे जेवण करायला सर्वजण बाहेर पडले. जवळच्याच एका खानावळीत सर्वांनी जेवणावर यथेच्छ ताव मारला आणि पुन्हा खोलीवर आले. दुपारचे अडीज वाजून गेले होते, सर्वानाच

थोडा शिन आला होता, एक एक करीत सर्वजण आडवे झाले आणि दुपारच्या गाढ झोपेत विलीन झाले.

संध्याकाळ होत आली होती, सूर्याची केशरी किरण आसमंतात पसरली होती. सर्व मुलांचा ग्रुप आणि ड्रायव्हर मामा संध्याकाळची रपेट करण्यासाठी बाहेर पडले. समुद्रकिनाऱ्याला लागून मोठमोठी नारळाची झाड होती, तसेच इतरही विविध प्रकारची झाड होती. गर्द झाडीतून फिरण्यासाठी छोट्या मोठ्या पायवाटा होत्या.

विक्रम आणि त्याचे मित्र त्या गर्द झाडांमधुन निवांत फेरफटका मारीत होते. माणसांची वर्दळ फारच तुरळक होती. विक्रम सकाळचा प्रसंग जवळपास विसरलाच होता. सर्वजण बराच वेळ त्या ठिकाणी फिरले, फोटो काढले. सूर्यास्त होऊन आता हळूहळू अंधार पडू लागला होता. सर्वांनी परत मागे फिरण्याचा निर्णय घेतला.

एका पायवाटेवरून जाताना अचानक विक्रमच्या कानी एक आवाज पडला.

'विक्रम...'

विक्रमने दचकून मागे पाहिले, दूरपर्यंत कोणीच दिसत नव्हते. क्षणभर काहीच न कळून विक्रम स्तब्ध उभा राहिला. वाऱ्याचा एक मोठा झोत आला आणि सळसळत निघून गेला. विक्रम वळला आणि बघतो तर काय त्या भल्या मोठ्या परिसरात तो एकटाच उभा होता, त्याचा एकही मित्र तेथे दिसत नव्हता. अंधार पूर्ण दाटला होता. पावसाची रिपरिप सुरू झाली होती. अथांग समुद्राच्या अजस्र लाटांचा आवाज कानी पडत होता. विक्रम पुरता गोंधळून गेला होता. पाय लटपटू लागले होते आणि पुन्हा त्याच्या कानी तो आवाज पडला.

'विक्रम...'

विक्रमच्या छातीत धस्स झाले. त्याने मागे वळून पाहिले आणि समोर जे काही होते ते पाहून त्याच्या काळजाचा ठोकच चुकला.

त्याच्या समोर एक माणूस उभा होता. डोळ्यांच्या खोबण्या रिकाम्या होत्या आणि त्यामधून रक्त थेंब थेंब सांडत होते. त्याच्या चेहऱ्यावर एक विकट हास्य पसरले होते. रक्ताळलेली जीभ त्याने एकवार ओठांवरून फिरवली.

पाऊस आता मुसळधार पडू लागला होता. विक्रमचे मित्र आणि ड्रायव्हर मामा विक्रमचा शोध घेत होते.

"अरे असा कसा अचानक नाहीसा झाला हा विक्रम", मामा म्हणाला.

"विक्रम माझ्या मागूनच चालत होता, बराच वेळ त्याची काही चाहुलच लागली नाही म्हणून मी मागे वळून बघितलं तर विक्रम कुठेच नव्हता", जगदीश घाबरल्या स्वरात म्हणाला.

"आता कुठे शोधायचा याला, पाऊस पण जोरदार पडू लागलाय", मामा म्हणाला.

"मामा मी आणि अब्दुल खोली वर जाऊन बघून येतो", जगदीश म्हणाला.

"ठीक हाय, तोपर्यंत मी जयेश आणि तुषार इकडच्या परिसरात शोध घेतो", मामा म्हणाला.

जगदीश आणि अब्दुल खोली वर पोहोचले तेथे त्यांनी रूम तपासली, घर मालकाकडे विचारपूस केली. पण कोणालाही विक्रम बद्दल काही माहिती नव्हती.

इकडे मामा मुलांसोबत विक्रमचा शोध घेत होता. समुद्राच्या आजूबाजूचा परिसर पाहिला, मार्केट आणि इतर काही जागेवर पाहिले पण विक्रम कोठेच सापडला नाही.

विक्रम नाहीसा होऊन आता तीन तास उलटले होते. रात्रीचे दहा वाजून गेले होते. सर्वजण तहान भूक विसरून विक्रमला शोधत होते पण प्रत्येक ठिकाणी निराशा पदरी पडत होती.

मुसळधार पाऊस पडत होता. रात्रीचे अकरा वाजले होते. एका भल्या मोठ्या झाडाखाली जगदीश आणि अब्दुल उभे होते. दूरवरून एक व्यक्ती त्यांच्या दिशेने येत होती. भर पावसात ती व्यक्ती भिजत हळूहळू चालत त्यांच्या दिशेने येत होती. जगदीश आणि अब्दुल त्या दिशेनेच पाहत होते. काळ्याकुट्ट अंधारात मुसळधार पावसामुळे समोरचे अस्पष्ट दिसत होते.

ती व्यक्ती आता अगदी वीस पावलांवर येऊन ठेपली होती, तो विक्रमच होता.जगदीश आणि अब्दुल धावतच पुढे गेले.

जगदीश आणि अब्दूलने त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती करायला सुरुवात केली पण विक्रमचा काहीच प्रतिसाद नव्हता.

"अरे काय झालंय तुला, बोलत का नाहीस", अब्दुल म्हणाला.

"अरे काही तरी बोल, कुठे होतास इतका वेळ", जगदीश.

"जगदीश आपण आधी याला हॉटेल रूमवर घेऊन जाऊया, पाऊस खूप पडतोय, आणि तुषारला फोन करून सांग विक्रम सापडला म्हणून", अब्दुल म्हणाला.

ठीक आहे असे म्हणत जगदिशने तुषारला फोन करून सांगितले.

सर्वजण हॉटेलच्या रूमवर बसले होते.

"अरे मी तर ठरवलं होतं, पोलीस स्टेशनला जाऊन याची हरवल्याची तक्रार करायची", मामा म्हणाला.

"माझ्या पण मनात तेच आलं होतं, पण तेव्हड्यात आम्हाला हा सापडला", अब्दुल म्हणाला.

"काय बोलला का, कुठे होता, काय झालं काही", मामाने विचारले.

"अरे मामा तो काहीच बोलत नाहीये, शून्यात बघत बसला होता, काय झालाय काही माहीत नाही", जगदीश म्हणाला आणि एव्हढ्यात विक्रम बाथरूम मधून बाहेर आला.

"अरे असे का बसलाय सर्वजण, जेवायचं कधी, किती उशीर झालाय", विक्रम अगदी सहज म्हणाला आणि सर्वजन एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले.

"अरे संध्याकाळपासून आमच्या जीवात जीव नव्हता, तू अचानक किनाऱ्यावरून गायब झालास, त्यानंतर कुठे कुठे नाही शोधला तुला, होतास तरी कुठे तू", मामा म्हणाला.

"मी... हा हा हा... बर सांगतो सर्व पण आधी जेऊन घेऊया, मला खूप भूक लागली आहे आता, चला जेऊन घेऊ", विक्रम म्हणाला.

काही वेळातच सर्वजण जेवले, विक्रम अगदी नॉर्मल वागत बोलत होता, जणू काही घडलेच नव्हते.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. सर्वजण हॉटेल बाहेरच्या अंगणात बसले होते.

“मी आता जे काही सांगणार आहे त्यावर कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही”, विक्रम सांगत होता.

“असं विश्वास न बसण्यासारखं काय घडलं, सांग आम्हाला”, मामा म्हणाला.

“संध्याकाळी जेव्हा आपण फिरायला बाहेर पडलो, त्या झाडांच्या परिसरात मला एक विचित्र आवाज आला होता, तो आवाज अजूनही माझ्या कानात घुमतोय, त्या आवाजाने मी जणू संमोहित झालो होतो, मी त्या आवाजाच्या दिशेने चालत गेलो, आणि एका ठिकाणी, एका भल्या मोठ्या झाडाखाली मला जे काही दिसले ते बघून माझे डोळे दिपले”, विक्रम धीर गंभीर आवाजात बोलत होता.

“काय दिसले तुला”, जगदीशने आश्चर्याने विचारले.

“त्या झाडाखाली एक मोठा खड्डा होता, त्या खड्यात एक पेटी होती, आणि त्या पेटीत सोने नाणे, हिरे मोती भरले होते, ते पाहून मी अचंबित झालो, हृदयाची धडधड होऊ लागली, आता फक्त आठवूनही अंगावर शहरे येताहेत”, विक्रम बोलत होता.

सर्वजण काहिक्षण विक्रमच्या तोंडाकडे बघत राहिले आणि खो खो करीत हसू लागले पण मामाच्या तोंडावर अजूनही आश्चर्य पसरले होते.

सर्वांनी हा विषय हसण्यावारी नेला. पण जगदीशच्या मनाला काहीतरी खटकत होते. तो काहीशा संशयास्पद नजरेने विक्रमकडे पाहत होता.

काही वेळ सर्वजण इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसले.

रात्री सर्वजण झोपायला गेल्यावर मामाने विक्रमला एका बाजूला बोलावले.

"विक्रम तू खरच सांगत आहेस का त्या पेटीबद्दल", मामाने विक्रमला विचारले.

"अगदी खरं सांगतोय मामा, पण एवढं सगळं सोन नाणं घेऊन जाण्यासाठी मला कोणाची तरी मदत लागेल आणि कोणी तयार झालं नाही तर मी एकटाच मॅनेज करेन", विक्रमच्या डोळ्यात एक वेगळीच चमक होती.

"ठीक आहे तर मग चल, मला घेऊन चल तेथे", मामा म्हणाला.

रात्रीचा एक वाजून गेला होता. बाहेर मिट्ट काळोख पसरला होता. कोणालाही न सांगता मामा आणि विक्रम दोघेच हॉटेल मधून बाहेर पडले. मामाने सोबत एक टॉर्च घेतला होता.

दोघेही चालत समुद्रा जवळच्या त्या भल्या मोठ्या परिसरात आले. आजूबाजूचे वातावरण शांत होते. पावसाची संततधार सुरू होती. विक्रम पुढे तर मामा त्याच्या मागून चालत होता. साधारण दहा मिनिटे दोघेही चालत होते. काही वेळातच दोघेही एका मोठ्या झाडाखाली आले, तेथे विक्रम थांबला.

"बघा मामा, या पुढे", विक्रम त्या खड्ड्यात पाहत म्हणाला.

मामा हळूहळू पुढे आला त्याने समोर पाहिले, समोर एक मोठा खड्डा होता.

मामाने टॉर्चचा झोत त्या खड्डयात टाकला आणि समोरचे दृश्य पाहून त्याच्या छातीत धस्स झाले. पाय लटपटू लागले, त्याने एकवार विक्रमकडे पाहिले, विक्रमच्या चेहऱ्यावर एक खुनशी हास्य पसरले होते, त्याच्या चेहऱ्यात हळूहळू बदल होऊ लागला, दोन्ही डोळे नाहीसे होऊन त्या जागी काळी खोबणी दिसू लागली, दातांचे सुळे मोठे झाले होते. एका झटक्यात तो पुढे आला आणि त्याने मामावर झडप घेतली.

निष्प्राण झालेल्या मामाच्या देहाला त्याने त्या खड्यात फेकून दिले, मामाच्या शेजारीच आणखी एक मृतदेह पडला होता, विक्रमचा...

रात्रीचे दीड वाजून गेले होते. सर्व मुलं गाढ झोपेत होती.
जयेश आणि तुषार ज्या खोलीत झोपले होते, त्या खोलीच्या दरवाजावर जोरजोरात थाप पडली. जयेश आणि तुषार दोघेही खडबडून जागे झाले. जयेशने गडबडीने उठत दार उघडले. समोर मामा उभा होता. मामाच्या चेहरा घामाने थबथबला होता.

"जयेश तुषार दोघेही लवकर चला, विक्रम परत नाहीसा झालाय आणि मी त्याला समुद्राकडे जाताना पाहिलं", मामा भरभर बोलत होता.

त्याचा अविर्भाव पाहून जयेश आणि तुषार दोघेही मामा सोबत बाहेर पडले. तिघेही धावत पळत त्या जागी पोहोचले. समोर झाडाखाली मोठा खड्डा होता.

जयेश आणि तुषार पुढे आले, त्यांनी वाकून खड्डयात पाहिले. खड्डयात विक्रम आणि मामाचा मृतदेह पडला होता, ते पाहून दोघांनीही डोळे विस्फारले.

"ह.. हा मामा तर इथे पडलाय, मग आपल्या सोबत कोण...", जयेश आणि तुषारने मागे वळून पाहिले आणि क्षणात त्याने दोघांवर झडप घेत दोघांच्याही नरडीचा घोट घेतला.

एक एक करून तो सर्वांना संपवत होता, आता फक्त जगदीश आणि अब्दुल राहिले होते.

रात्रीचे दोन वाजून गेले होते. जगदीश आणि अब्दुल त्यांच्या खोलीत झोपले होते. दारावर जोरजोरात थापा पडू लागल्या. जगदीश आणि अब्दुल झोपेतून जागे झाले.

जगदिशने दरवाजा उघडला. बाहेर तुषार उभा होता.

"अरे जगदीश अब्दुल, खूप मोठा प्रॉब्लेम झालाय यार", तुषार रडवेल्या आवाजात म्हणाला.

"का रे काय झालं", जगदिशने विचारले.

"प्लिज माझ्यासोबत चला, तिकडे विक्रम, मामा आणि जयेश तिघेही नाहीसे झालेत", तुषार म्हणाला.

"काय सांगतोस, अरे सर्वजण झोपलेत इथे", असे म्हणत जगदीश रूमच्या बाहेर आला. त्याने बाजूच्या खोल्या तपासून पाहिल्या. खोल्या सताड उघड्या होत्या. आतमध्ये कोणीही नव्हते. ते पाहून जगदीश आणि अब्दुल चपापले.

"मी तिघांनाही समुद्राकडे जाताना पाहिले, प्लिज माझ्यासोबत चला, त्यांना शोधलं पाहिजे लवकर", तुषार म्हणाला.

"एक मिनिट थांब", असे म्हणत जगदीश आतमध्ये गेला. त्याच्या सोबत त्याने टॉर्च आणि मोबाईल घेतला.

अब्दुल, जगदीश आणि तुषार तिघेही बाहेर पडले. न राहून जगदिशच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती.

तिघेही समुद्रा जवळील त्या घनदाट परिसराच्या समोर पोहोचले होते. तुषार झपझप पुढे चालत होता.

जगदीश आणि अब्दुल त्या परिसरात पाय ठेवणार इतक्यात जगदीशचा मोबाईल वाजला, त्याला कोणाचा तरी फोन आला होता.

"तुषार थांब", अचानक जगदीश जागीच थांबत म्हणाला. तुषार जागीच थांबला.

"काय झालं चला पुढे, त्यांना शोधलं पाहिजे लवकर", तुषार म्हणाला.

"तुषार मला तुझ्या वडिलांचा फोन आला आहे, हे घे बोल", जगदीश मोबाईल पुढे करीत म्हणाला.

"अरे त्यांना कशाला सांगितलं", तुषार मोबाईल घेत म्हणाला.

काही वेळ तुषार मोबाईलवर संभाषण करीत उभा राहिला आणि त्याने फोन कट करून परत जगदीश कडे दिला.

"ठीक आहे चला आता लवकर", तुषार म्हणाला.

"काय म्हणाले तुझे वडील", जगदिशने विचारले.

"अरे काही नाही, घाबरलेत ते, कशाला सांगितलं तू त्यांना हे सगळं", तुषार मागे वळत म्हणाला.

"तुषार...
तुझे वडील तू लहान असतानाच वारलेत, मोबाईल वर तू ज्यांच्याशी बोललास ते माझे वडील होते", जगदीश करड्या आवाजात म्हणाला.

हे ऐकून समोरच्या त्याच्यात एक बदल जाणवला. तो सावकाश मागे वळला. तुषारची चर्या

बदलली होती. संतापाने त्याच्या मुठी आवळल्या होत्या. अब्दुल ते पाहून खूप घाबरला, तो चार पावलं मागे सरकला.

"हिम्मत असेल तर या माझ्या जागेत प्रवेश करा", तो म्हणाला.

"माझे मित्र कुठे आहेत", जगदीश म्हणाला.

गडगडाटी हसत तो म्हणाला, "म्हसनात".

ते ऐकून दोघेही चांगलेच घाबरले. अब्दुल लटपटू लागला होता. जगदीश कसाबसा धीर एकवटून उभा होता.

"तू... तू आहेस तरी कोण", जगदिशने विचारले.

आणि तो थंड आवाजात म्हणाला, "झोटिंग".

बघता बघता त्याच्यात बदल झाला, डोळे विस्फारून तो त्यांच्याकडे पाहू लागला, हळूहळू दातांचे सुळे बाहेर येऊ लागले. लालभडक रक्ताने भरलेली जीभ ओठांवरून फिरू लागली.

ते पाहून जगदीश आणि अब्दुल मागे वळले आणि सुसाट पळत सुटले. मागून तो आवाज आला, "वाचलात दोघ".

मृत्यूरेषा

नीरज एक आठ वर्षाचा हसरा, खेळकर मुलगा होता. त्याच्या आई वडिलांचा तो एकुलता एक आणि लाडका मुलगा होता. त्याच्या वडिलांचे नाव होते प्रभाकर आणि आईचे नाव विद्या होते.

जन्मल्या पासून त्याच्या आई वडिलांनी त्याला अगदी फुलाप्रमाणे जपले होते, त्याच्या आवडी निवडी हट्ट सर्व काही पुरवले. प्रभाकर एका मोठ्या ब्यांकेत ब्रँच मॅनेजर म्हणून कामाला होता. निरजच्या जन्माच्या आधी त्याची आई विद्या एका हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून कामाला होती. नीरज जन्मल्या नंतर तिने काम सोडून दिले होते.

सर्वकाही अगदी सुरळीत चालू होते. एके दिवशी नीरज त्याच्या आई वडिलांसोबत फिरायला बाहेर गेला होता. त्या दिवशी रविवार होता. तिघेही त्यांच्या चारचाकीने जवळच्याच एका हिल स्टेशनवर फिरायला गेले होते. प्रभाकरने दोन दिवसांची रजा घेतली होती.

दोन दिवस तिघेही भरपूर फिरले, नवनवीन जागा पाहिल्या, बाग बगीचे, उंच टेकड्या, डोंगर दरी, सर्वकाही. नीरज पहिल्यांदाच हे सर्व पाहत होता. तो खूप आनंदी होता.

तिसऱ्या दिवशी ते शहरात परतणार होते. गाडीने ते तिघेही मुंबईला यायला निघाले. गाडी मजल दरमजल करीत मुंबईजवळ पोहोचली आणि अचानक नीरजला धाप लागू लागली, तो श्वास घेण्यासाठी धडपडू लागला हे पाहून प्रभाकर आणि विद्या घाबरले. प्रभाकरने पटकन गाडी जवळच्याच एका हॉस्पिटलमध्ये वळवली.
तोपर्यंत नीरजची अवस्था फारच वाईट झाली होती.

तो संबंध दिवस इस्पितळात गेला. निरजच्या काही टेस्ट केल्या गेल्या. एक दिवस त्यांना इस्पितळातच राहावे लागले. दुसऱ्या दिवशी निरजचे रिपोर्ट आले. डॉक्टरांनी प्रभाकरला केबिनमध्ये बोलावून घेतले आणि जे सांगितले त्याने प्रभाकरच्या पायाखालची जमीनच सरकली. निरजला एक असाध्य आजार जडला होता. जो नकळत हळूहळू बळावला होता.

प्रभाकर आणि विद्याचे रडून रडून हाल झाले होते. निरजला त्या इस्पितळातून हलवण्यात आले. मुंबईच्या एका मोठ्या इस्पितळात निरजला तपासले गेले, नीरजची ट्रीटमेंट सुरू झाली.

महिनाभर नीरजची ट्रीटमेंट सुरू होती. इस्पितळाच्या फेऱ्या वाढत होत्या. वरून साधारण दिसणारा नीरज आतून कोमेजून गेला होता. कधी अचानक खोकल्याची उबळ यायची, कधी धाप लागून तो खाली बसायचा. प्रभाकर आणि विद्या पूर्ण कोलमडून गेले होते.

आणि एका रात्री...

नीरजला अचानक धाप लागायला चालू झाली, त्याच्या नाकातोंडातून रक्तस्त्राव होऊ लागला.

प्रभाकर आणि विद्या खूप घाबरले. निरजला इस्पितळात नेण्यात आले.

नीरज इस्पितळात बेडवर झोपला होता, त्याच्या आजूबाजूला डॉक्टर आणि नर्सचा घेराव होता. डॉक्टरांच्या चेहर्यावर चिंता स्पष्ट दिसत होती. नीरजला कृत्रिम श्वासोच्छ्वास चालू केला होता. नीरज शेवटच्या घटका मोजत होता. रात्रीचे बारा वाजून गेले होते.

बाजूला प्रभाकर आणि विद्या चिंताग्रस्त अवस्थेत बसून होते. दोघांच्याही डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. आपल्या एकुलत्या एक मुलाला अशा मरणासन्न अवस्थेत पाहून त्यांचा जीव तीळतीळ तुटत होता.

बेडच्या बाजूलाच असलेल्या मशीनवर निरजच्या हृदयाचे ठोके मंद मंद होत चालले होते, आणि अखेर तो क्षण आला. निराजच्या हृदयाचे ठोके पूर्णपणे बंद झाले होते, मशीनवरील वक्राकार पळणारी ती रेषा अखेर स्तब्ध झाली.

डॉक्टरांनी घड्याळात पाहिले आणि बाजूला उभ्या असलेल्या नर्सकडे पाहत ते म्हणाले, "टाइम ऑफ डेथ, १२.१५".

डॉक्टर मागे वळले आणि प्रभाकरकडे पाहत म्हणाले, "आय एम सॉरी".

प्रभाकरच्या हृदयाचा ठोकाच जणू काही क्षण बंद पडला, तो निरजच्या निश्चल देहाकडे पहात बसला. विद्याच्या डोळ्यातुन अश्रुधारा वाहू लागल्या, निरजपाशी ती आली त्याच्या डोक्यावरून तिने प्रेमाने हात फिरवला.

घड्याळात रात्रीचे साडे बारा वाजले होते. निरजच्या देहावर पांढरी चादर अंथरली होती. प्रभाकर काही वेळासाठी बाहेर गेला होता. विद्या निरजच्या बाजूलाच बसून होती. तिचा थरथरता हात तिने निरजच्या हातावर ठेवला होता. मन अगदी सुन्न झाले होते.

आणि अचानक हॉस्पिटल मधील लाईट गेल्या. संपूर्ण इस्पितळात अंधार पसरला. विद्या मात्र आहे तशीच बसून राहिली होती. बाजूला असलेल्या खिडकीतून पांढुरका प्रकाश सावकाश त्या खोलीत पसरला.

आणि अचानक तिच्या कानावर एक आवाज पडला, "आई".

विद्याने चमकून इकडे तिकडे पाहिले, तिला वाटले तिला भास झाला असावा आणि दुसऱ्याच क्षणी तिला तिच्या हाताखाली एक हालचाल जाणवली. निरजचा हात हलला होता. विद्याने एका झटक्यात निरजच्या अंगावरील चादर ओढून बाजूला केली आणि बघते तर काय नीरजने डोळे उघडले होते, तो हालचाल करू लागला होता. अंधुक पांढऱ्या प्रकाशात निरजचे डोळे चमकले.

ते पाहून विद्याला काय करावे सुचले नाही ती धावत बाहेर गेली आणि डॉक्टरांना घेऊन आली. तोपर्यंत प्रभाकरही तेथे आला होता आणि हॉस्पिटलच्या लाईटही.

प्रभाकर आणि विद्या अत्यानंदाने रडत होते. डॉक्टरांनी निरजला तपासले. नीरजच्या हृदयाचे संथ ठोके मशीनवर उमटत होते. डॉक्टर आणि नर्स त्याच्या भोवतीने गोळा झाले होते. हा सगळ्यांसाठी एक चमत्कारच होता.

नीरज आणखी एक दिवस इस्पितळात राहिला. हळूहळू त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत होती. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली काही टेस्ट करून घेतल्या, सर्वच बाबतीत नीरजने डॉक्टरांना अवाक केले होते. मेडिकल सायन्समध्ये घडलेली ही एक अत्यंत दुर्मिळ अशी घटना होती.

नीरज दोनच दिवसात पुन्हा त्याच्या घरी आला होता. काही दिवस औषध पाणी घेतल्यावर नीरज बरा झाला.

दिवसेंदिवस नीरजच्या प्रकृतीत सुधारणा होत गेली आणि त्या असाध्य आजाराच्या कोणत्याही खुणा मागे राहिल्या नव्हत्या. पण नीरजमध्ये एक वेगळेपण आले होते, तो पूर्वीसारखा हसत खेळत नसायचा, तो काहीसा अबोल झाला होता, पण प्रभाकर आणि विद्याला त्याचे फारसे काही वाटले नाही.

आणि एका रात्री...

त्या रात्री प्रभाकरला ऑफिसहून यायला उशीर होणार होता. घरी विद्या आणि नीरज दोघेच होते. रात्रीचे जेवण आटोपून विद्या आणि नीरज प्रभाकरची वाट पाहत बसले होते. रात्री अकरा वाजता प्रभाकरचा फोन आला आणि आज घरी येणार नसल्याचे त्याने सांगितले. निरजला झोप आली होती. विद्याने फोन ठेवला आणि निरजला घेऊन ती बेडरूममध्ये गेली.

रात्रीचे बारा वाजले होते. विद्याला नुकतीच झोप लागली होती आणि अचानक घरातील लाईट गेल्या. खिडकीतून पांडुरका प्रकाश घरात पसरला. नीरज बेडवर उठून बसला होता.

काहीच वेळात विद्याला जाग आली, तिने पाहिले की नीरज जागेवर उठून बसला आहे.

तिने त्याला विचारले, "नीरज काय झालं, गरम होतंय का".

"माझ्या आईला बोलव", नीरज म्हणाला.

"नीरज अरे असा काय करतोस, मीच तुझी आई आहे", विद्या म्हणाली.

"तू माझी आई नाहीस"

हे ऐकून विद्या चरकली. तिने निरजकडे निरखून पाहिले. अंधुक उजेडात त्याचा चेहरा काहीसा वेगळा दिसत होता. विद्याच्या अंगातून भीतीची लहर सळसळत गेली.

अचानक नीरज बेडवर आडवा झाला, घरातील लाईट आल्या, विद्याने निरजकडे पाहिले, नीरज घामाने चिंब भिजला होता.

दुसऱ्या दिवशी विद्याने हा प्रकार प्रभाकरला सांगितला, प्रभाकरही ते ऐकून थोडा अस्वस्थ झाला.

"विद्या नीरजला आपण एखाद्या सायकयट्रिकला दाखवून बघूया?", प्रभाकर म्हणाला.

"अरे असा काय बोलत आहेस, नीरजला काय वेड लागलय अस म्हणायचं आहे का तुला", विद्याच्या आवाजात एक कंप होता.

"विद्या, गेल्या काही दिवसांपासून मला नीरज मध्ये काही बदल जाणवत आहे, तो पूर्वीसारखा नाही वाटत मला", प्रभाकर म्हणाला.

पण दोघांनी विचार करून सायकयट्रिक ला भेटायचा निर्णय आणखी थोडे दिवस पुढे ढकलला.

आणि दुसऱ्याच रात्री...

प्रभाकर, विद्या आणि नीरज झोपले होते, रात्रीचे सव्वा बारा वाजले आणि घरातील लाईट गेल्या. प्रभाकरला जाग आली आणि तो जागचा उठला. अंधारात चाचपडत त्याने मोबाईल हातात घेतला आणि टॉर्च चालू केला. त्याने बाजूला टॉर्च फिरवला तेव्हा त्याला दिसले कि नीरज त्याच्या जागेवर नव्हता. ते पाहून तो घाबरला त्याने विद्याला जागे केले. दोघेही लगबगीने जागचे उठले. घरात मिट्ट काळोख पसरला होता. बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते. टॉर्चच्या प्रकाशात दोघेही घराच्या दिवाणखाण्यात आले. दोघेही नीरजला आवाज देत इकडे तिकडे शोधत होते पण नीरजचा काहीच प्रतिसाद येत नव्हता. विद्या आता रडकुंडीला आली होती आणि अचानक एक आवाज आला कोणीतरी भिंतीवर काहीतरी आपटत आहे असा आवाज येत होता.

प्रभाकर आणि विद्या दोघेही सावध झाले, आवाज हॉलमध्ये वरच्या बाजूने येत होता, प्रभाकराने सावकाश टॉर्चचा झोत हॉलमधील कपाटाच्या वरती टाकला आणि समोरचे दृश्य पाहून दोघांची बोबडीच वळली. समोर कपाटावर नीरज पाठमोरा बसला होता आणि भिंतीवर त्याचे डोके आपटत होता.

“न... नीरज”, प्रभाकराने थरथरत्या आवाजात नीरजला आवाज दिला तेव्हा नीरज थांबला पण त्याने मागे वळून पाहिले नाही.

"व... विद्या आतून स्टूल घेऊन ये", प्रभाकर विद्याला म्हणाला पण विद्या दिडमुठ होऊन नीरजकडे पहात राहिली होती.

"विद्या... आतून स्टूल घेऊन ये", प्रभाकर मोठ्या आवाजात म्हणाला तशी विद्या भानावर आली आणि बेडरूममध्ये पळाली.

इकडे प्रभाकर हळूहळू कपटाकडे गेला आणि तीतक्यात आतमधून विद्या जोरात किंचाळली तिचा आवाज ऐकून प्रभाकरच्या छातीत धस्स झाले तो आतमध्ये पळतच गेला, अंधुक पांढऱ्या प्रकाशात विद्याचा घाबरलेला घामाने निथंबलेला चेहरा बेडच्या दिशेला होता. प्रभाकरने टॉर्चचा झोत बेडवर टाकला आणि बघतो तर काय बेडवर नीरज झोपला होता.

विद्या थरथरत जागीच उभी होती. प्रभाकर धावत बाहेर गेला, त्याने कपाटावर पाहिले पण तिथे बसलेला नीरज आता नाहीसा झाला होता. घरातील लाईट परत आल्या होत्या.

प्रभाकर आणि विद्याला रात्रभर झोप लागली नाही. दोघेही निरजच्या बाजूला बसून होते. पहाटे केव्हातरी दोघांनाही डोळा लागला.

सकाळी प्रभाकर आणि विद्या दोघेही गहन विचारात गढून गेले होते. नीरज सोबत जे काही

घडत होते ते दोघांच्याही आकलनाच्या पलीकडे होते.

"प्रभाकर मला आता खूप भीती वाटू लागले, तू पाहिलास ना काल रात्रीचा प्रकार", विद्या.

"त्याचाच विचार करतोय मी विद्या, रात्रभर मला नीट झोप लागली नाही, काय करावे काही सुचत नाही", प्रभाकर.

"प्रभाकर, मला वाटतं.. आपण श्रीरंग दादाला बोलावून घेऊया", विद्या म्हणाली.

"हम्म... ठीक आहे, आजच फोन करूया"

श्रीरंग विद्याचा मावस भाऊ होता. विद्याने श्रीरंगला फोन केला आणि घडलेली सर्व हकीकत सांगितली, श्रीरंगने सारी हकीकत लक्षपूर्वक ऐकून घेतली.

"विद्या.. काळजी नको करुस मी उद्याच तिकडे येतो, पण तुम्ही सांभाळून राहा", श्रीरंग म्हणाला.

"हो दादा पण यात काही धोका आहे का", विद्याने विचारले.

"प्रभाकरकडे फोन देतेस?", श्रीरंग.

"हा श्रीरंगदादा बोला", प्रभाकर.

"प्रभाकर, विद्याने मला सर्वकाही सांगितलं आहे, काल रात्री जो प्रकार घडला तो खूप भयंकर होता, नीरजकडे लक्ष द्या, आणि रात्री सावध राहा, मी उद्या सकाळी लवकरच येईन, तेव्हा सविस्तर बोलु", श्रीरंग म्हणाला.

"ठीक आहे दादा", प्रभाकर म्हणाला.

रात्र आरंभली होती, प्रभाकर आणि विद्याच्या मनात धाकधूक वाढत होती. जेवण वगैरे आटोपून नीरज झोपी गेला पण विद्या आणि प्रभाकर जागेच होते. रात्री बराच वेळ दोघेही जागे राहिले पण अनुचित असा काहीच प्रकार घडला नाही. रात्री दोन नंतर दोघेही झोपी गेले.

बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते. रात्रीचे ३ वाजले होते. प्रभाकरला कसल्याशा आवाजाने जाग आली आणि तो जागचा उठला, त्याने बाजूला पाहिले, विद्या आणि नीरज शांत झोपले होते. तो जागचा उठला आणि किचनमध्ये गेला. फ्रिज उघडून त्याने पाण्याची बाटली घेतली आणि पाणी पिले. बाटली आत ठेऊन तो वळणार इतक्यात त्याला कोणाचा तरी धक्का लागला. त्याने दचकून इकडे तिकडे पाहिले पण तेथे कोणीच नव्हते. तो पुन्हा बेडरूममध्ये आला तेव्हा त्याला दिसले की विद्या उठून बसली होती.

प्रभाकर विद्या जवळ आला. विद्याचा डोळ्यात अश्रू होते.

"काय झालं विद्या, का रडते आहेस", प्रभाकरने काळजीने विचारले.

"प्रभाकर... प्रभाकर मला स्वप्न पडलं होतं, स्वप्नात नीरज आला होता, तो रडत होता, तो अडकला आहे प्रभाकर.. तो आपल्या आजूबाजूलाच आहे", विद्या भरभर बोलत होती.

"विद्या शांत हो... आपला नीरज इथे आहे तो बघ, शांत झोपला आहे तो", बाजूला झोपलेल्या निरजकडे पाहत प्रभाकर म्हणाला.

"प्रभाकर हा आपला नीरज नाही.. हा आपला नीरज नाही"

प्रभाकरने विद्याला जवळ घेतले आणि तिला शांत केले. पण त्याच्याही मनात शंकांचे वादळ उठले होते. पहाटे केव्हातरी दोघेही झोपी गेले.

सकाळी आठ वाजता दारावरची बेल वाजली. श्रीरंग आला होता. श्रीरंग वयाने चाळीशीच्या आसपास होता. देहयष्टी भरदार होती. समोरच्याला धडकी भरावी असा पहाडी तर अडलेल्याला आधार वाटावा असा आश्वासक आवाज होता. श्रीरंगला पाहून प्रभाकर आणि विद्याला खूप आधार वाटला.

सकाळी नऊ वाजता सर्व आटोपून श्रीरंग, विद्या आणि प्रभाकर चहा पित बसले होते. विद्या आणि प्रभाकरने सर्व हकीकत कथन केली आणि श्रीरंगने ती शांत चित्ताने ऐकून घेतली.

"प्रभाकर.. विद्या आज रात्री मला काही गोष्टी जाणून घ्याव्या लागतील, मला हे प्रकरण थोडे किचकट वाटत आहे, पण काळजी करू नका, सर्वकाही ठीक होईल", श्रीरंग म्हणाला.

एव्हाना नीरज उठून बाहेर दिवाणखान्यात आला होता, श्रीरंग निरजकडे पाहत होता, श्रीरंगला पाहिल्यावर नीरज थोडा अस्वस्थ झाला. त्याच्या नजरेतून आपली नजर चोरून नीरज आतमध्ये गेला. त्याचे हे असे वागणे नक्कीच खटकण्याजोगे होते.

"बरं विद्या मी थोड्या वेळाने बाहेर जाईन, शहरात आमच्या गुरुजींची मठी आहे, तेथे जाणार आहे, मी संध्याकाळी परत येईन, प्रभाकर तू वाटल्यास कामाला जाऊन संध्याकाळी लवकर ये", श्रीरंग.

"नाही मी आज घरीच थांबत आहे", प्रभाकर म्हणाला.

काही वेळाने श्रीरंग घरातून बाहेर पडला. प्रभाकर आणि विद्या रोजच्या कामाला लागले. दिवस हळूहळू सरत होता. नीरज त्याच्या खोलीत एकटाच दिवसभर बसून राहिला. दुपारच्या जेवणाव्यतिरिक्त तिघे एकत्र आले नव्हते. निरजकडे पाहून विद्या आणि प्रभाकर कष्टी होत होते.

रात्री आठ वाजता श्रीरंग मठीतून परतला. रात्रीचे जेवण करण्यासाठी सर्वजण बसले होते. सर्वांचे जेवण झाले होते आणि निवांत बसून होते. नीरज तटावरून उठणार इतक्यात श्रीरंगने निरजला आवाज दिला.

"नीरज", श्रीरंग संथ आवाजात निरजकडे निरखून पाहत म्हणाला तसा नीरज पुन्हा अस्वस्थ झाला.

"काय मामा", नीरजचा अस्वस्थ स्वर.

"काही नाही बाळा, जा जाऊन झोप आता शांत", श्रीरंग म्हणाला.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. श्रीरंग दिवाणखान्यात बसला होता. डोळे बंद करून तो काही मंत्र

पुटपुटत होता. त्याच्या समोर मेणबत्तीचे रिंगण होते. अचानक घरातील लाईट गेल्या. प्रभाकर आणि विद्या दोघेही जागे होते. प्रभाकरने एक टॉर्च सुरू केला. बेडवर नीरजची हालचाल सुरू झाली होती. विद्या आणि प्रभाकर बेडवरून खाली आले.

"इथे ये माझ्यासमोर", बाहेरून श्रीरंगचा मोठा आवाज आला तसा नीरज बेडवरून खाली उतरला. त्याचा चेहरा पंढरफट दिसत होता. संथ पावलांनी तो बेडरूमच्या बाहेर आला आणि श्रीरंग समोर येऊन बसला.

"बोल कोण आहेस तू", श्रीरंग करारी आवाजात म्हणाला. पण नीरज काही न बोलता गप्प बसून होता, तो एकटक श्रीरंगकडे पाहत होता.

"बोल कोण आहेस तू, तुझं नाव काय, हे शरीर का धरलं.. बोल", श्रीरंग मोठ्या आवाजात म्हणाला.

"तू कशाला आला आहेस इथं, जा इथून", नीरज.

श्रीरंग ने त्याच्या कापडी पिशवीतून एक मिठाची पिशवी बाहेर काढली, त्यात त्याने कासलिशी भुकटी मोसळली आणि निराजच्या अंगावर शिंपडली. तसा नीरज कळवळू लागला. हे सर्व पाहून प्रभाकर आणि विड्याच्या मनाला अनेक यातना होत होत्या.

"बोल आता काय नाव आहे तुझं, नाय तर जळून राख होशील", श्रीरंग म्हणाला तसा तो बोलू लागला.

"माझं नाव अखिलेश, मला माझ्या आईला भेटायचं आहे... माझ्या आईला बोलवा", तो कळवळून म्हणाला.

"तुझा मृत्यू कसा झाला"

"अक्सिडंट... अक्सिडंट... अक्सिडंट", असे म्हणत नीरज बेशुद्ध झाला.

श्रीरंग आणि प्रभाकरने निरजला बेडवर झोपवले आणि सर्वजण झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच श्रीरंग आणि प्रभाकर हॉस्पिटलमध्ये गेले. तेथे त्यांनी माहिती काढली तेव्हा त्यांना कळले की नीरज ज्या खोलीत होता तेथे आदल्या दिवशी अखिलेश नावाच्या मुलाचा मृत्यू झाला होता.

श्रीरंगने अखिलेशच्या वडिलांचा फोन नंबर हॉस्पिटल मधूळ मिळवला. प्रभाकर आणि श्रीरंग अखिलेशच्या वडिलांना भेटायला त्यांच्या घरी गेले.

"दिनकरराव जी गोष्ट मी तुम्हाला आता सांगणार आहे, ती थोडी अविश्वसनीय आहे", श्रीरंग अखिलेशच्या वडिलांना म्हणाला.

दिनकरराव प्रश्नार्थक नजरेने पाहत म्हणाले, "अविश्वसनीय म्हणजे... मला स्पष्ट सांगा".

"ही गोष्ट तुमचा मुलगा अखिलेश, त्याच्याबाबतीत आहे, पण त्याआधी मला तुमच्याकडून थोडी माहिती हवी आहे, अखिलेशचा मृत्यू कसा झाला, कोणत्या परिस्थितीत झाला", श्रीरंग.

दिनकरराव थोडे अस्वस्थ झाले, घसा खकरात त्यांनी सुरुवात केली.

"अखिलेशला जाऊन आता महिना होत आला, त्या दिवशी सकाळी माझी बायको तिच्या माहेरी नाशिकला गेली होती, अखिलेश सुद्धा तिच्यासोबत जाणार होता पण हट्ट करून तो माझ्यासोबत इथेच थांबला होता आणि माझी बायको एकटीच नाशिकला निघून गेली, संध्याकाळी मी अखिलेशला घेऊन मैदानात गेलो होतो.. तेथून परत येताना, मी आणि अखिलेश बाईकवरून घरी परतत होतो, एका वळणावर समोरून एक भरधाव गाडी अचानक समोर आली, मी ब्रेक दाबला आणि गाडी स्लिप झाली, मी रस्त्याच्या एका कडेला पडलो होतो, आणि दुसऱ्याच क्षणी माझ्या लक्षात आले की अखिलेश गाडीखाली आला होता, मी त्याला तात्काळ इस्पितळात आणले, तेथे त्याच्यावर उपचार सुरू केले, माझी बायको नाशिकहून निघाली होती, पण ती हॉस्पिटल मध्ये पोहोचण्या पूर्वीच अखिलेशचा मृत्यू झाला होता", दिनकरराव कष्टी आवाजात सर्व हकीकत सांगत होते.

"तुमची बायको, त्या आता कुठे आहेत त्यांच्याशी मी बोलू शकतो का", श्रीरंगने विचारले.

"अखिलेश गेल्यापासून ती एक शब्दही बोलली नाही, पण तुम्ही हे सर्व का विचारत आहात", दिनकरराव म्हणाले.

"दिनकरराव तुम्हाला सर्वकाही समजेल, आमच्यावर विश्वास ठेवा, तुमच्या बायकोला एकदा बोलवा, त्यांच्याशी बोलणं खूप गरजेचं आहे", श्रीरंग म्हणाला.

दिनकरराव प्रभाकर आणि श्रीरंग ला आतल्या खोलीत घेऊन गेले तेथे दिनकररावांची पत्नी शून्यात नजर लावून बसली होती. तिच्या खोलीत कोणी आले आहे याचीही तसदी तिने घेतली नाही. श्रीरंग एक खुर्ची ओढून तिच्यासमोर बसला.

"ताई मी तुमचं दुःख समजू शकतो, तुमचा मुलगा अखिलेश असा एकाएकी जग सोडून गेला त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, पण आता स्वतःला सावरा", श्रीरंग बोलत होता पण प्रमिलाचा काहीच प्रतिसाद नव्हता.

शेवटी श्रीरंग म्हणाला, "ताई... अखिलेश.. तुमचा मुलगा, त्याचा जीव अडकला आहे".

हे ऐकल्यावर प्रमिला अस्वस्थ झाली, तिने मान श्रीरंगकडे वळवली आणि म्हणाली, "काय म्हणालात, माझा मुलगा.. अखिलेशचा जीव अडकला आहे".

"हो ताई माझ्यावर विश्वास ठेवा. अखिलेशला तुम्हाला भेटायचे आहे, त्याचा आत्मा तुम्हाला शेवटचे भेटण्यासाठी अडकून पडला आहे", श्रीरंग म्हणाला.

हे ऐकून दिनकरराव आणि प्रमिलाच्या डोळ्यात अश्रू आले. श्रीरंगने नीरज सोबत घडलेली सारी हकीकत त्यांना कथन केली. ते ऐकून दोघेही अचंबित झाले.

त्याच रात्री दिनकरराव आणि प्रमिला दोघेही प्रभाकरच्या घरी आले. रात्र आरंभली होती. श्रीरंगने त्याच्या समोर मेणबत्तीचे वर्तुळ बनवले होते. हातात रुद्राक्षाची माळ होती. संथ आवाजात मंत्रपठण चालू होते. रात्रीचे सव्वा बारा वाजले तशा घरातील लाईट गेल्या. बेडवरील नीरज श्रीरंगाच्या समोर येऊन बसला. दिनकरराव आणि प्रमिला दोघेही तेथेच होते.

"अखिलेश... तुझी आई तुला भेटायला आली आहे", श्रीरंग म्हणाला.

त्या आवाजाने नीरजच्या निर्जीव नजरेत काहीशी हालचाल झाली आणि त्याने आवाज दिला, "आई...".

तो अखिलेशचा आवाज होता.

"हा... हा तर अखिलेशचा आवाज आहे", असे म्हणत प्रमिला पुढे आली.

"आई तू आलीस मला भेटायला"

"हो बाळा मी आली आहे", असे म्हणत प्रमिलाने अखिलेशला जवळ घेतले आणि दोघेही रडू लागले. सर्वांच्या डोळ्यात अश्रुधारा वाहत होत्या. बराच वेळ अखिलेश त्याच्या आईच्या कुशीत पडून राहिला होता.

"आई, आता मला जावं लागेल", असे म्हणत अखिलेश बाजूला झाला. प्रमिला कष्टी आवाजात हुंदके देत होती.

"नाही बाळा, मी नाही जाऊ देणार तुला", असे म्हणत प्रमिलाने पुन्हा अखिलेशला जवळ घेतले.

"आई, बाबा मला आता जावंच लागेल. तुला शेवटचे भेटावे एव्हढीच इच्छा होती, त्यामुळे माझा जीव अडकला होता. पण आता मला हे शरीर सोडावे लागेल", अखिलेश म्हणाला.

दिनकररावांनी प्रमिलाला बाजूला घेतले. निरजचा देह हळूहळू सैल पडू लागला होता. आणि तो बसल्या जागी आडवा झाला. त्याच्या शरीरातून एक पारदर्शक आकृती सावकाश बाहेर पडली आणि अदृश्य झाली. अखिलेश निघून गेला होता. निरजचे शरीर तसेच निपचित पडून होते.

"श्रीरंग दादा, माझा नीरज कुठे आहे", विद्या धावतच पुढे आली. पण श्रीरंगने तिला थांबवले.

पुढच्या क्षणी त्याने त्याच्या जवळील एक द्रव्य बाहेर काढले आणि निरजच्या शरीरावर शिंपडले. काही वेळातच निरजच्या शरीराची हालचाल होऊ लागली. निराजच्या सूक्ष्म जीवाला त्याचा देह परत मिळाला होता. नीरज सावकाश जागचा उठून बसला. तो अगदी पूर्वीसारखा दिसत होता. प्रभाकर आणि विद्याकडे पाहून तो हसला. विद्याने त्याला प्रेमाने जवळ घेतले.

दुसऱ्या दिवशी श्रीरंग, प्रभाकर आणि विद्या चहा पित बसले होते. श्रीरंग दुपारची गाडी पकडून गावी जाणार होता.

"श्रीरंग दादा फार मोठ्या संकटातून नीरज बाहेर पडला, तुझे खुप खुप आभार", विद्या म्हणाली.

"आभार कसले मानते आहेस, अग नीरज माझाही भाचाच आहे ना", श्रीरंग हसत म्हणाला.

"पण दादा, हे सर्व अगदी अविश्वसनीय होत", प्रभाकर म्हणाला.

"हो, जीवन आणि मृत्यू च्या मध्ये एक बारीक रेषा आहे, ज्यापलीकडे एक अनाकलनीय जग वसले आहे, ज्याचा उलगडा अजून कोणालाही झाला नाही", श्रीरंग म्हणाला.

"पण दादा निरजला पुन्हा काही त्रास होणार नाही ना", विद्याने विचारले.

"नाही, आता त्याला कसलाही त्रास नाही होणार, तुम्ही दोघेही निश्चित राहा", श्रीरंग आश्वासक आवाजात म्हणाला.

पिंपळवेळा

मनीष आणि अमोल, दोघेही जुळे भाऊ होते. नऊ वर्षाचे, दोघेही खोडकर आणि खेळकर होते. तब्बल वर्षभरानंतर दोघेही आई वडिलांसोबत त्यांच्या मामाच्या गावाला कोकणात आले होते.

कोकणातल्या त्यांच्या मामाला दोन मुली आणि एक मुलगा होता. मुलाचे नाव सुरेश होते, तो सर्वात मोठा चौदा वर्षाचा होता. मधली कविता 12 वर्षाची आणि धाकटी प्रणाली 9 वर्षाची होती.

कोकणात मामाचा मोठा दुमजली बंगला होता. समोर मोठे आंगण आणि छोटी बाग होती. गावातली घर थोड्या थोड्या अंतरावर होती. आजूबाजूचा परिसर शांत असायचा. मामाच्या गावी गेल्यावर दोघांचीही चंगळ असायची. दिवसभर खेळ, मजामस्ती करण्यात वेळ निघून जायचा.

त्या दिवशी मामाच्या एका मित्राकडून सर्वांना जेवणाचे आमंत्रण आले होते. मामाचा मित्र म्हणजे मनोहर नाईक एक वरिष्ठ पोलीस अधिकारी होते. गावात त्यांना मोठा मान होता. त्यादिवशी सर्वांचे रात्रीचे जेवण त्यांच्याकडे होते.

रात्रीचे आठ वाजले होते. थंडीचे दिवस होते आणि अमावस्या असल्याने बाहेर मिट्ट काळोख पसरला होता. घरातील सर्वांनी आवरून घेतले. मामाच्या मित्राचे घर जवळच शंभर दीडशे पावलांवर होते त्यामुळे सर्वांनी चालत जायचे ठरले. मुलांचे आवरून झाले तशी सर्व मूल दंगा मस्ती करीत अंगणात आलीत. सर्वात मोठा सुरेश, सर्व मुलांना नाईकांच्या घरापर्यंत नेण्याची जबाबदारी त्याची होती तर मोठी मंडळी नऊ वाजता येणार होती. सर्वांना घेऊन सुरेश अंगणातील फाटकाबाहेर पडला. त्याच्या हातात एक टॉर्च होता. बाकी सर्व मूल एकमेकांच्या खोड्या काढीत, दंगामस्ती करीत पुढे चालत होती.

नाईकांच्या घरापर्यंत एकही दुसरे घर नव्हते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठी झाड होती. पुढे पन्नास पावलांवर एक मोठे फार जुने अशे पिंपळाचे झाड होते. मनीष आणि अमोल दोघांनीही एकाच प्रकारचे कपडे घातले होते. दोघांतील फरक सहज लक्षात येत नव्हता. असा एखादा कार्यक्रम असला की दोघेही एकसारखे कपडे घालत असत.

थोडे पुढे चालून आल्यावर मनिषला खोड करायची लहर आली. त्याने हळूच अमोलच्या कानात काहीतरी सांगितले आणि अमोल खुदूखुदु हसत त्याच्या प्लॅनमध्ये सहभागी झाला.

सुरेश सर्वांच्या मागून चालत होता. अचानक मनीष धावत पुढे गेला आणि काही कळायच्या आत कोठेतरी गुडूप झाला. सुरेश मागून ओरडला आणि धावतच पुढे आला पण मनीष कोठेच दिसत नव्हता, त्याने टॉर्च आजूबाजूला फिरवला पण काहीच मागमूस लागला नाही. त्याने

मागे वळून अमोलला विचारले, "अरे कुठे गेला हा मनीष".

तेव्हा अमोल म्हणाला, "अरे मी मनीष आहे, अमोल कुठेतरी पळत गेला".

अमोल अमोल करीत सर्वजण त्याला आवाज देऊ लागले. त्या गोंधळात आता सोबत असलेला अमोलही कोठेतरी गायब झाला होता. हे सुरेशच्या लक्षात आले आणि त्याची पाचावर धारण बसली. घाबरून तो इकडे तिकडे पाहू लागला. त्याच्या दोन्ही बहिणी आता पुरत्या घाबरल्या होत्या.

"चला परत घरी जाऊन आई बाबांना घेऊन येऊया", सुरेश घाबरल्या स्वरात म्हणाला.

तिघेही मागे वळणार इतक्यात त्यांना एक आवाज ऐकू आला, त्यांनी मागे वळून पाहिले, सुरेशने आवाजाच्या दिशेने टॉर्चचा झोत टाकला तर समोर एका झाडाच्या बाजूला अमोल दिसला, तो झाडावर एक हात ठेवून उभा होता.
"मी अमोल, ये इकडे", अमोल हसत म्हणाला.

सुरेश धावत पुढे गेला तर अमोल एका झटक्यात तेथून पुन्हा झुडुपांमागे गुडूप झाला. सुरेशने रागाने अमोलला आवाज दिला तर लगेचच दुसऱ्या बाजूला पुढे मनिषने आवाज दिला, "मी मनीष, ये इकडे".

सुरेशचा पारा आता चढला होता. त्याने मोठ्याने ओरडून सांगितले, "मनीष अमोल दोघेही पटकन बाहेर या, नाहीतर, दोघांनानी इथेच सोडून आम्ही परत घरी जाणार, मग तुमचे आई बाबा तुम्हाला चांगलेच ओरडतील".

ते ऐकून बाजूच्या झाडीतून एक खसखस ऐकू आली. सुरेशच्या लगेच टॉर्चचा झोत तिकडे टाकला. झाडीच्या आत थोड्या अंतरावर एक पिंपळाचे झाड होते, दोघेही पिंपळाच्या झाडाखाली उभे राहून खुदू खुदू हसत होते. सुरेश पटकन धावत पुढे आला, तेव्हा सुरेशच्या लक्षात आले की आपण अमावस्येच्या रात्री या पिंपळाच्या झाडाखाली उभे आहोत. आजूबाजूला भयाण शांतता आणि मिट्ट काळोख पसरला होता. सुरेशने झाडावरून एक नजर फिरवली. वाऱ्याचा एक मोठा झोत आला आज पानांची सळसळ झाली.

त्याने दोघांनाही फटकारत, ओरडत तेथून बाहेर आणले. कविता आणि प्रणाली दोघीही घाबरून सुरेशच्या मागून धावत होत्या.

सर्वजण आता रस्त्यावर आले.

"अरे तुम्हा दोघांनाही कळत नाही का, ही काय थट्टा करायची वेळ नाही आणि जागा तर बिलकुल नाही", सुरेश रागाने म्हणाला.

"अरे गम्मत केली आम्ही तुमची, घाबरलात ना", मनीष म्हणाला.

"अरे कसली गम्मत, तुम्हाला माहित नाही, ते पिंपळाचे झाड, ज्या झाडाखाली तुम्ही उभा होता, तिथं तो असतो", सुरेश खालच्या आवाजात थोडा चाचरत म्हणाला.

"कोण असतो, त्या झाडावर", मनीषने विचारले.

अमोल मात्र काही न बोलता शांतपणे चालत होता.

"अरे आता नाही सांगत, त्याचे नावही घेऊ शकत नाही मी, चला पटपट आता इथून", सुरेश.

पाच मिनिटात सर्वजण नाईकांच्या घरी पोहोचले. नाईकांच घर अगदी प्रशस्त होते. त्यांच्या दोन्ही मुलांसोबत सर्वजण मिसळले. आणि अंगणात सर्वजण खेळू लागले. मोठी माणसं यायला अजून अवकाश होता.

न राहवून सुरेशच्या मनात एक अनामिक भीती चमकत होती कारण अमोलच्या बोलण्यातील तुटकपणा, संथ हावभाव त्याला जाणवत होते.

रात्रीचे नऊ वाजले तसे, मामा मामी आणि अमोल मनिषचे आई वडील आले. सर्व मुलांनी खेळ थांबवला आणि पटापट सर्वजण आत आले. हातपाय धुवून सर्वजण एका रांगेत खाली बसले.

मामांनी मनिशच्या आई वडिलांची ओळख नाईकांना करून दिली. मामाने मनीषकडे बोट करत त्याची ओळख करून दिली, मनीषने नाईकांना नमस्कार केला.
मग अमोलकडे बोट दाखवत मामा म्हणाला,"आणि हा मनीषचा जुळा भाऊ, अमोल".

असे म्हटल्यावर अमोल जगचा ताडकन उठला आणि म्हणाला, "कोण अमोल, मी अमोल नाही, मीपण मनीषच, माझं नाव मनीष आहे".

हे ऐकून सर्वजण थोडे ओशाळले. मनीषचे मामा हसत म्हणाले, "खूप खोडकर आहेत हो दोघंही".

एका बाजूने सुरेश भेदरलेल्या नजरेने पाहत होता. त्याला जाणवत होते की काहीतरी चुकीचं घडत आहे.

काहीवेळातच सर्वांचं जेवण तयार झाले आणि सर्वजण जेवायला बसले. जेवणाचे ताट समोर येताच अमोलने अधाशासारखे ते ओढून घेतले आणि वचा वचा जेवायला सुरुवात केली. एव्हाना अमोल मधील हा बदल सर्वांच्या लक्षात आला होता. पण काही न बोलता सर्वांनी जेवण आटोपून घेतले, नाईकांचा निरोप घेतला आणि घरचा रस्ता पकडला.

आता सर्वजण एकत्र चालत घरी निघाले होते. अमोल एकटाच एका बाजूने शांतपणे चालत होता. पन्नास पावलांवर असलेल्या त्या मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली सर्वजण पोहोचले होते आणि अचानक एक आवाज सर्वांना ऐकू आला, तो अमोलचा आवाज होता. घाबरून सर्वांनी इकडेतिकडे पाहिले. आवाज पिंपळाच्या झाडाकडून येत होता. चमकून सर्वांनी सोबत असलेल्या अमोलकडे पाहिले पण तो अमोल तेथून नाहीसा झाला होता.

घाबरून आता सर्वांची पाचावर धारण बसली होती. पुन्हा एकदा अमोलचा आवाज आला तसा मामा त्या झाडाच्या दिशेने धावला, मागोमाग अमोलचे वडीलही धावत पुढे आले.

झाडाखाली पोहोचल्यावर त्यांनी इकडेतिकडे पाहिले आणि त्यांना दिसले झाडावर थोड्या उंचीवर अमोल दोन फांद्यांवर घाबरून बसला होता. वडिलांना पाहताच त्याने रडायला सुरुवात केली. मामा झपझप झाडावर चढला आणि सावकाश अमोलला खाली घेऊन आला.

बाकीचे सर्वजण आजूबाजूला जमा झाले होते. कविता आणि प्रणाली तर रडकुंडीला आल्या होत्या. काय घडत आहे हे सर्वांच्या आकलनाच्या पलीकडे होते. सर्वजण अमोलला घेऊन घरी पोहोचले.

अमोलच्या अंगावर बारीकसारीक जखमा झाल्या होत्या. त्याच्या आईने त्याला स्वछ धुवून घेतले आणि मलमपट्टी केली.

सर्व धांदलीत बराच वेळ झाला होता. रात्रीचे बारा वाजून गेले होते. सर्वांनी झोपायची तयारी केली. अमोल त्याच्या आईजवळ झोपला.

मनीष आणि सुरेश वेगळ्या खोलीत झोपले होते. रात्री झोपण्यापूर्वी सुरेश मानिषला म्हणाला.

"बघितलं तुमच्या या खोडकरपणा मूळे अमोलला तो लागीरला, तुम्ही त्या झाडाजवळ जायला नको होतं"

पण मनीष कडून काहीच प्रतिसाद आला नाही तो शांतपणे डोळे टक्क उघडून छताकडे पाहत होता.

"अरे ऐकतोस ना मनीष...मनीष"

"कोण मनीष.. मी मनीष नाही अमोल आहे...हा हा हा"

शेवटचा तास

"रोहन उठ साडे सा वाजल्यात, साळला जायला उशीर हुईल", रोहनची आई मोठ्या आवाजात म्हणाली.

रोहनला जाग आली होती पण तो मुद्दामून उठायला उशीर करीत होता. आज शाळेत जायचे त्याच्या अगदी जीवावर आले होते, त्यात खांबके सरांचा तो विक्षिप्त चेहरा डोळ्यासमोर आला की पोटात गोळा उठत होता. रोहन डोळे बंद करून गपचूप अंथरुणावर पडून राहिला. त्याचा हा कांगावा आईच्या लक्षात आला होता, आई स्वयंपाक घरातून त्याच्याजवळ आली आणि त्याच्या काखेत हात घालून उठवले.

"आई... आज न्हाय जाणार मी साळला", रोहन म्हणाला.

"का र अस कराय लागलास, परवाबी पोटात दुखतंय म्हून सांगून बुडवलीस साळा, ते काय न्हाय उठ लवकर आन आवरून जा", आई जरा रागातच म्हणाली.

रोहन जड अंगाने आणि मनाने अंथरुणातून उठला. रोहन समोर प्रश्न पडला होता की आईला कोणत्या शब्दात आणि कसं सांगायचं की तो खांबके मास्तर त्याला त्रास देतो, उगाच खडू मारून मला काईबाई प्रश्न विचारतो. गृहपाठ पूर्ण असला तरी अक्षरावरून खोट काढीत छड्या मारतो. गेल्या आठवड्यात तर रोहनला शाळा सुटल्यावर थांबवून घेतले... उगाचच काहीही कारण नसताना आणि कधी कधी तर... बापरे विचार करूनही अंगावर काटा येतो, एकदा वर्गात मधल्या सुट्टीत रोहन डबा खात बसला होता आणि सहज त्याची नजर उजव्या बाजूला खिडकीकडे गेली, बघतो तर काय तो खांबके सर खिडकीत उभा राहून रोहनकडेच बघत होता, त्याच्या चेहऱ्यावर एक विचित्र छद्मी हास्य होते. त्याला पाहून रोहन दचकला होता, तोंडातला घास तोंडातच राहिला होता.

रोहनने रेंगाळत अंघोळ वगैरे उरकून घेतली. शाळेची कपडे अंगावर चढवलीत आणि डबा, दप्तर घेऊन तो घराबाहेर पडला. सव्वा सात वाजले होते. उशीर झाला तर ते आणि कारण त्या मास्तराला मिळेल त्रास द्यायला, या विचाराने रोहन झपझप चालत शाळेत पोहोचला. प्रार्थना सुरू झाली होती. रोहन वर्गाच्या दरवाजासमोर उभा राहिला. त्याने हळूच आत वाकून पाहिले, आत शिक्षक नव्हते, ते पाहून त्याला हायसे वाटले. प्रार्थना संपली आणि तो वर्गात शिरणार एवढ्यात त्याच्या खांद्यावर एक जडशीळ हात पडला. रोहनने दचकून मागे वळून पाहिले तर खांबके सर समोर. त्यांच्या डोळ्यात आज एक वेगळीच छटा रोहनला दिसून आली.

"काय रे, वेळेवर शाळेत यायला होत न्हाय का", खांबके मास्तर खेकसले.

"माफ करा मास्तर... प... परत न्हाय व्हणार अस", रोहन बिचकत म्हणाला.

"चल आत", पाठीत एक जोराचा धपका मारीत मास्तराने त्याला आत ढकलले.

रोहन गपगुमान जाऊन आपल्या जागेवर बसला. खांबके मास्तर तावातावाने आत आले. मुलांनी पटापट गृहपाठाच्या वह्या बाहेर काढून ठेवल्या. रोहननेही आपली वही बाहेर काढून समोर उघडून ठेवली. मास्तर हातात छडी घेऊन सावकाश सर्वांच्या वह्यावरून नजर फिरवीत होते आणि 'चप्पप' आवाज झाला.

"नालायका, हे लिहून आणायला सांगितलं होतं का मी", मास्तर बाजूच्या महेशवर गरजले आणि आणखी एक पट्टी त्याच्या दंडावर मारीत पुढे सरकले. इकडे रोहनच्या हृदयाची धडधड वाढत होती. गृहपाठ पूर्ण होता पण तरीही त्याच्या पोटात वेगळ्याच अनामिक भीतीने गोळा उठत होता. मास्तर रोहनच्या बाकड्याजवळ आले आणि त्याच्या वहिवरून नजर फिरवली. रोहन एक आवंढा गिळणार इतक्यात मास्तरांनी त्याचा कान पकडून जोरात पिरगळला.

"आई... आई"

"शिंच्या तुला हजारवेळा सांगितलं, अक्षर कळण्यासारखं काढीत जा म्हणून, तू असा ऐकणारा नाहीस, आज शेवटचा तास संपला की इथेच थांबायचं, घरी जायचं नाही", असे म्हणत मास्तर पुढे गेले.

रोहन आपल्या लाल झालेल्या कानावरून हात फिरवीत बसला. तो अर्धा तास रोहनला कित्येक तासांसारखा गेला. एकामागून एक तास निघून गेले. शेवटचा तास सुरू झाला होता. शेवटच्या तासाचे गुरुजी आज आले नव्हते. मुलांचा वर्गात कल्ला चालला होता पण रोहन गपचूप बसून राहिला होता.

'आज आपल काय खर न्हाय, त्यो खांबके आज मला वरबाडून काढणार, अंगाची साल निघेपर्यंत पट्टीने बडवणार', यासारख्या विचारांनी रोहन घाबरून गेला होता. पाचवीतल्या कोवळ्या मनाच्या रोहनवर या भीतीने पूर्ण ताबा मिळवला होता. काय करावे या विचाराने रोहन भंडावून गेला आणि त्याला सुचले...

शाळा सुटायला आता अवघी दहा मिनिटे राहिली होती. घंटा झाली की तो मास्तर तडक इकडेच येणार, तोपर्यंत थांबून चालणार नव्हते. रोहन जागेवरून उठला. दप्तर काखेत मारले आणि धावतच वर्गाबाहेर आला. बाकीची मूल फक्त त्याच्याकडे पाहत राहिली.

शाळेला चारी बाजूंनी पाच फुटी भिंत होती आणि त्या भिंतींवर दोन दोन फुटाचे लोखंडी अनुकुचीदार बाण बसवले होते, समोरील पटांगातून पुढे शाळेचा मुख्य दरवाजा होता. पण तेथे शिपाई उभा होता, तेथून जाणे शक्य नव्हते, सुदैवाने रोहनचा वर्ग एका कोपऱ्याला लागून होता. उजवीकडे वळत लपतछपत रोहन शाळेच्या मागच्या बाजूला आला.

भिंतीला लागून एका कोपऱ्यात एक मोठे झाड होते. रोहन काही विचार न करता धावतच झाडाजवळ आला, हातातील दप्तर जोरात भिंती पलीकडे भिरकावले आणि तो झाडावर चढू लागला. थोडे वर चढल्यावर एका फांदीचा आधार घेत रोहन हळू हळू पुढे सरकू लागला. छातीत धडधड वाढत होती. डोळ्यासमोर खांबके मास्तरांचा चेहरा येत होता आणि भीतीने

पोटात गोळा उठत होता. लटपटत्या हातापायांनी तो पुढे सरकला, भिंत मागे टाकून तो उडी मारणारच होता आणि हाय रे कर्मा...

झाडाची फांदी क्षणात कडकडत मोडली. रोहन खाली पडला ते थेट त्या लोखंडी बाणांवर. क्षणात होत्याचे नव्हते झाले. लोखंडी बाण रोहनच्या पोटात आरपार घुसले आणि काही क्षणातच रोहनची या जगातून सुटका झाली. रोहन गतप्राण झाला.

शाळेच्या आवारात मोठी गर्दी जमा झाली होती. रोहनचा मृतदेह खाली उतरवण्यात आला. रोहनच्या घरात आक्रोश झाला.

असेच काही दिवस निघून गेले...

त्या दिवशी शेवटचा तास खांबके मास्तरांचा होता. इतिहासाचा तास होता. सर्वांच्या वह्या तपासून झाल्या, पुस्तक काढून पुढचा धडा शिकवला गेला आणि बघता बघता शाळा सुटल्याची घंटा वाजली. राष्ट्रगीत झाले आणि मुले पटापट वर्गातून बाहेर पडली. खांबके मास्तरांनी सामानाची आवराआवर सुरू केली आणि एक आवाज वर्गात घुमला...

'मास्तर... मी थांबलोय... शेवटच्या तासासाठी'

खांबके मास्तर आवाज ऐकून मनातून चरकला. त्यांच्या मानेवरील केस ताठ झाले. सामान भरायला खाली वाकवलेली मान त्यांनी हळूहळू वर केली आणि बघतात तर काय...

समोर शेवटच्या बाकड्यावर तो बसला होता... अंगातील पांढरा शर्ट लाल काळ्या रक्ताने माखलेला... तांबड्या लाल डोळ्यांनी, विचकलेल्या दातांनी हसत तो मास्तरांकडे पाहत होता.

मास्तर त्याला पाहून दचकला. घशातील आवाज घशातच अडकला. तो बाकड्यावरून उठला आणि हळू हळू चालत मास्तरांच्या दिशेने येऊ लागला.

मास्तरांचे पाय जणू जमिनीला चिटकले होते. अंगातील बळ निघून गेले होते. तो आणखी जवळ आला... होय तो रोहनच होता.

मास्तरांच्या छातीत एक जोरात कळ आली. मास्तर खाली कोसळला आणि गतप्राण झाला.

विळखा तिचा

भीती काय असते माहीत आहे तुला. या जगाच्या पलीकडेही एक जग आहे, जे अनाकलनीय आणि भयानक आहे, जे आपल्या डोळ्यांना दिसत त्याच्या पलीकडे एक अनंत अंधारी पोकळी आहे जिथे काय वसले आहे कोणालाच माहीत नाही.

ऐकायचे आहेत माझे अनुभव... तर ऐक.

लोकांनी याला अनेक नाव दिली आहेत, दडपण, स्लिप प्यारेलिसिस, हॅलूसिनेशन नाव काहीही असो, पण जी भीती दाटून येते ती जीवघेणी असते.

अनुभव पहिला

मी नऊ दहा वर्षांचा असेन तेव्हाची ही गोष्ट, मला आलेला तो पहिला भयंकर अनुभव, दिवस आठवत नाही पण ती रात्र अजूनही माझ्या मनावर कोरलेली आहे, ती आठवण अजूनही अंगावर काटे आणते.

रात्रीचे कदाचित तीन वाजून गेले होते, मी गाढ झोपेतून कसल्याशा आवाजाने जागा झालो होतो, हळूहळू मी डोळे उघडले, झोपेचा अम्मल सावकाश कमी झाला होता, बाहेर एखादे कुत्रे भुंकत होते.

अंधुक नजर हळूहळू स्थिरावत होती आणि समोरचे दृश्य सावकाश स्पष्ट होत होते आणि... मला दिसले घराच्या त्या कौलारू छतावर काहीतरी होते. अंग पूर्ण काळे ठिक्कर होते, धुरांच्या वलयाप्रमाणे ते अंग वळवळत होते. पुढच्या क्षणातच माझी नजर पडली त्या चेहऱ्यावर. तो भयंकर चेहरा अजूनही माझ्या डोळ्यासमोर जसाच्या तसा आहे. तिचे तोंड शरीराच्या उलट दिशेला वळले होते. लांबसडक तोंड, मोठे पांढरे डोळे माझ्याकडेच पाहत होते. माझ्या हृदयाची होणारी धडधड जाणवत होती, क्षणाक्षणाला ती वाढत होती, ओरडावे म्हणून मी एक असफल प्रयत्न केला, पण आवाज जणू घशातच अडकला होता.

छतावरील तिने आता तिचे तोंड उघडले होते, तिचे लांब लांब सुळे असलेले दात विचकून ती सावकाश पुढे सरकत होती.

माझे अंग थरथरू लागले होते, हात पाय सुन्न पडले होते. मला जागचे हलता येत नव्हते. शरीरातील ताकत जणू कोणी शोषून घेतली होती.

ती आता अगदी माझ्या वरती आली होती, पुढे काय होणार काहीच कल्पना नव्हती मला. जड अंगाने मी निपचित पडून होतो आणि अचानक तिने एक किंकाळी फोडत झेप घेतली ते थेट माझ्या अंगावर.

भीतीच्या परमोच्च स्थानावरून मी पुन्हा एक प्रयत्न केला, सर्व बळ एकवटून मी अंगाला हिसका दिला आणि जड झालेले अंग मोकळे झाले, झटक्यात मी जागेवर उठून बसलो, छाती भात्यासारखी उडत होती. अंग घामाने चिंब भिजले होते. मी घाबरून इकडेतिकडे पाहिले, घरात कोणीही नव्हते. त्यानंतर कित्येक दिवस मला नीट झोप लागली नव्हती.

अनुभव दुसरा

मी सोळा वर्षाचा होतो. उन्हाळ्याचे दिवस होते. मध्यरात्र उलटून गेली होती. साधारण ३ वाजताची वेळ होती.

मला जाग आली, अंधुक प्रकाशात समोरचे दृश्य स्पष्ट दिसत होते, माझा बेड, माझे पाय आणि बाजूला असलेले लाकडी कपाट.

काही सेकंदांचा अवकाश गेला असेल आणि मला दिसले, बाजूला असलेल्या लाकडी कपाटाच्या वर काही हालचाल होत होती. काय होत तिथे. मी सावध झालो आणि जागेवरून हलायचा प्रयत्न केला पण माझे अंग जणू साखळदंडाने बांधले गेले होते.

कपाटावरील त्याची हालचाल वाढली होती, सावकाश ते कडेला सरकत होते, कधीही कपाटावरून ते खाली पडणार होते. माझ्या हृदयाची धडधड वाढत होती.

आणि अचानक जोरात हालचाल होऊन ते खाली पडले ते थेट माझ्या पायाजवळ. ते एक पोते होते. खिडकीतून पडलेल्या पांढुरक्या अंधुक प्रकाशात मला स्पष्ट दिसत होते. ते राखाडी पोते हलत होते.

त्या पोत्यातून अचानक एक विचित्र आवाज आला, बारीक पण हृदयात धडकी भरवणारा आवाज आणि पुढच्याच क्षणाला त्या पोत्यातून घरंगळत काहीतरी बाहेर आले. ते पाहून माझी छाती भात्यासारखी उडू लागली. माणेवरचे केस ताठ झाले. बचावासाठी मी ओरडण्याचा, किंचाळण्याचा प्रयत्न केला पण गळा जणू कोणी आवळून धरला होता.

माझ्या समोर त्या पोत्यामधून एक मुंडके बाहेर पडले होते. ते एका बाईचे मुंडके होते. तिचे लांबसडक केस अंथरुणावर पसरले होते. मोठे पांढरे डोळे माझ्यावर रोखले होते. दात विचकून ती माझ्या कडे बघून हसत होती. दात आणि ओठांवर लालसर रक्ताचे डाग दिसत होते.

पुढच्या क्षणी तिने तोंडाचा मोठा आ वासला आणि ते मुंडके माझ्या पायाच्या दिशेने वळले. मी ओरडण्याचा प्रयत्न केला, पण आवळलेल्या गळ्यातून आवाज बाहेर पडत नव्हता, त्या मुंडक्याने माझ्या पायाला स्पर्श केला, तिचे आ वासलेले मोठे तोंड माझ्या पायावर टेकवले आणि एक थंडगार शिरशिरी माझ्या अंगभर फिरली, जोराचा हिसका देऊन मी जागचा हललो आणि काहीतरी किंचाळत जागचा उठून बसलो.

समोर किव्वा त्या खोलीत आता काहीच नव्हते. ते मुंडके नाहीसे झाले होते, ते पोते नाहीसे झाले होते. मी घाबरून पाय चाचपुन पाहिले, पायाला काहीही झाले नव्हते, पण माझे पाय थरथरत होते.

अनुभव तिसरा

मी बावीस वर्षांचा होतो. कॉलेजमध्ये आमचा सात आठ मुलांचा ग्रुप होता. एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही फिरायला कोकणात गेलो होतो. तेथे समुद्रकिनारी एका छोट्या हॉटेलवर आम्ही सर्वजण थांबलो होतो.

दिवसभर आम्ही मूल बाहेर हिंडलो फिरलो. समुद्र पाहिला, बोटिंग केली. दिवस अगदी मजेत गेला होता. रात्रीचे जेवण झाल्यावर आम्ही सर्वजण लवकरच झोपलो होतो. दिवसभर फिरल्यामुळे अंगात बराच शिन आला होता. पडल्या पडल्या मला झोप लागली होती.

मध्यरात्र उलटून गेली होती. मला जाग आली होती. हॉटेलची ती खोली मला स्पष्ट दिसत होती. समोरच्या बेडवर झोपलेला माझा मित्र दिसत होता, आणि अनेक वर्षानंतर पुन्हा तोच भयंकर अनुभव मला आला. माझे सर्वांग जड झाले होते. हातापायातील शक्ती निघून गेली होती.

तोच बारीक पण हृदय गोठवणारा आवाज मला आला. तो आवज माझ्या पलंगाखालून येत होता. मला कळून चुकले की ती परत आलीये. पण पुढे काय अनुभव येणार आहे याची काहीच कल्पना नव्हती.

पुढच्या क्षणी पलंगाखालून एक हलका धक्का बसला. माझ्या पाठीखाली काहीतरी वळवळत असल्याची जाणीव झाली. हळूहळू ते वळवळणारे जीव वाढू लागले. पाठीला वेदना होऊ लागली होती. असंख्य इंगळ्या पाठीला डसत होत्या, पण मला जागचे हलताही येत नव्हते. भीतीने सर्वांग घामाने भिजले होते.

मला जाणवले की मी पलंगावरून हळूहळू हवेत उचलला जात आहे, शक्तीहीन पडलेले माझे शरीर हवेत उचलले होते. जे काही माझ्या पाठिखाली होते ते मला छताकडे घेऊन चालले होते.

भीतीने माझा जीव अर्धा झाला होता. मला वाटले की माझा अंत जवळ आला आहे आणि दुसर्याच क्षणी त्या खोलीतील लाईट सुरू झाल्या. मी समोर पाहिले, माझा मित्र जागचा उठला होता. तो माझ्या जवळ आला. मी घाबरून अंथरुणात थरथरत पडलो होतो.

त्याने मला उठवले आणि पाणी प्यायला दिले. आणि काही वेळाने मी शांत झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही फिरायला बाहेर पडलो. रात्रीची आठवण मनात ताजी होती पण मित्रांसोबत मजामस्ती करण्यात मी गुंग झालो.

समुद्र किनारी आम्ही बराच वेळ खेळ खेळलो. पाण्यात पोहलो. काही वेळाने दमल्यावर मी एकटाच थोडा बाजूला आलो आणि एका झाडाखाली निवांत बसून राहिलो होतो. काही वेळाने तेथे एक माणूस आला होता. त्याच्या अंगात पांढरा सदरा होता. पायात धोतर होते, गळ्यात रुद्राक्षाची माळ होती.

तो माझ्या बाजूला येऊन बसला होता आणि माझ्याकडे पाहत म्हणाला, "तिची नजर आहे तुझ्यावर, संबंध आयुष्य दडपणाखाली आहे तुझं".

हे ऐकून मी अस्वस्थ झालो. त्याने माझा चेहरा निरखून पाहिला, माझ्या कपाळावर अंगठा

ठेऊन डोळे बंद केले आणि म्हणाला, "ती तुझ्या खूप जवळची कोणीतरी आहे".

मला काहीच कळले नाही. मी फक्त प्रश्नार्थक चेहऱ्याने त्याच्याकडे पाहत राहिलो. तो मला सांगत होता की मला धोका आहे, एका स्त्री पासून मला धोका आहे आणि ती स्त्री माझ्या जवळची आहे. माझ्या घरी तर माझे आई वडील, माझा छोटा भाऊ एव्हढेच, नातेवाईकही खूप आहेत पण कोणाशी आमचं वाकड नाही. कोणाशी वैर नाही की वादविवाद नाही.

हनिमूनला आलेल्या अनुकेश आणि गिरीजा त्यांच्या हॉटेल बाहेरील एका छोट्या बगिच्यात बसले होते. अनुकेशने गिरीजाला त्याला आलेले सर्व अनुभव सांगितले होते. गिरीजाच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट दिसत होती.

"बापरे... एव्हड्या भयानक अनुभवातून गेला आहेस तू, ऐकून अंगावर काटा येतोय", गिरीजा म्हणाली.

"हो आता बरीच वर्षे झालीत, अजून मला तसा काही अनुभव नाही आला", अनुकेश म्हणाला.

"पण तुला खार सांगू अनु, मला वाटत हे सर्व आपल्या मनात उत्पन्न झालेलं असत, मनातील भीती ही वेळोवेळी डोकं बाहेर काढत असते आणि पुन्हा सुप्त अवस्थेत आपल्या खोल मनात शाबूत राहते", गिरीजा म्हणाली.

"असेलही, पण हे अनुभव माझ्यासाठी खरच जीवघेणे होते", अनुकेश म्हणाला.

"असो, रात्र खूप झाली आहे अनु चल झोपायला जाऊया", गिरीजा म्हणाली.

अनुकेश आणि गिरीजा आपल्या खोलीत गेले, रात्रीचे अकरा वाजून गेले होते. दोघेही झोपी गेले.

रात्र अधिक गडद होत गेली, बाहेर एखादे कोल्हेकुई ऐकू येत होती, शहरापासून दूर असलेल्या त्या पर्यटन स्थळी वस्ती फारच तुरळक होती. हॉटेल, गावापासून बरेच आतमध्ये होते.

रात्रीचे तीन वाजले होते. अनुकेशची झोप चाळवली होती. हॉटेलच्या खोलीत अंधुक पांढरा प्रकाश पडला होता, बाजूला गिरीजा पाठमोरी झोपली होती. त्याला तहान लागली होती. तो जागचा उठला, उठताना बाजूला असलेल्या भल्यामोठ्या आरशावर त्याची नजर गेली आणि त्याला दिसले.

गिरीजाचे डोळे सताड उघडे होते, तिचे डोळे पांढरेफट पडले होते, त्यातील काळी बुबुळे नाहीशी झाली होती. चेहरा काळा पडला होता. ते पाहून अनुकेशच्या पोटात भीतीने गोळा उठला. हातपाय थरथरू लागले.

गिरीजाने तोंड हळूहळू उघडले, तिचे ते लांबसडक सुळे पाहून अनुकेशला छातीत जोराची कळ आली. घशाला कोरड पडली.

पुढच्याच क्षणी गिरीजाने मान एका झटक्यात मागे फिरवली, ती जागची उठली आणि अनुकेशच्या जवळजवळ येऊ लागली. अनुकेशला कळून चुकले होते की त्याचा अंत जवळ आला आहे.

विचकलेले दात कडकड वाजवत ती अनुकेशच्या आणखी जवळ आली आणि अनुकेशवर तुटून पडली. अनुकेशच्या शरीराचे ती लचके तोडत होती, हळूहळू अनुकेश मृत्यूच्या जवळ जात होता. अंग सैल पडले होते, डोळ्यासमोर अंधार दाटू लागला होता आणि एक शेवटचा हुंदका देऊन अनुकेशने प्राण सोडला होता.